शनिवार, 01 ऑक्टोबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 59
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 01 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-59 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

## चर्चेतली बातमी

### एकदा 'वंदे भारत' ट्रेनने प्रवास करा : पंतप्रधान

आधुनिक केसरी न्यूज


**अहमदाबाद :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधीनगर ते मुंबई सेंट्रल दरम्यान धावणाऱ्या 'वंदे भारत' एक्स्प्रेसला आज हिरवा झेंडा दाखवला. ही एक्स्प्रेस भारतातील पहिली स्वदेशी सेमी-हायस्पीड ट्रेन आहे. ही ट्रेन विमानाच्या तुलनेत १०० पट कमी आवाज करते. या ट्रेनचा अनुभव घेतल्यानंतर ज्यांना विमानाने प्रवास करायची सवय आहे ते लोक या ट्रेनला प्राध्यान्य देतील, असा दावा या ट्रेनच्या लोकार्पण सोहळ्यात अहमदाबादेत पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. गांधीनगर ते अहमदाबाद प्रवास करत मोदींनी प्रवासाचा आनंदही लुटला. गांधीनगर आणि अहमदाबाद या जुळ्या शहरांचा विकास एक उत्तम उदाहरण आहे. याच मॉडेलप्रमाणे गुजरातमधील जुळ्या शहरांचा विकास केला जात आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. या सोहळ्यात बोलताना मोदींनी विद्यार्थ्यांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. नववी ते बारावी आणि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मेट्रोच्या कामांबाबत विचारले पाहिजे. त्यासाठीचा खर्च, बोगद्यांचे बांधकाम याविषयी त्यांना प्रश्न पडले पाहिजे.

# आरबीआयने पुन्हा वाढवला व्याजदर

## सलग चौथ्यांदा व्याजदरात वाढ : गृहकर्जासह सर्व प्रकारची कर्जे होणार महाग

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : आरबीआयने सलग चौथ्यांदा व्याजदरात वाढ केली आहे. मध्यवर्ती बँकेने रेपो दरात ५० बेसिस पॉईंटची वाढ केली आहे. आरबीआय बँकांना ज्या दराने कर्ज देते तो दर म्हणजे रेपो दर. रेपो दरात वाढ केल्यास बँकांच्या कर्जाचा खर्च वाढणार आहे. ते कर्ज बँका ग्राहकांना देतील आणि त्यामुळे गृहकर्जासह सर्व प्रकारची कर्जे महाग होणार आहेत.**



बँका देऊ करत असलेली नवीन किरकोळ कर्जे बाह्य बेंचमार्कशी जोडलेली असतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, ते रेपो दराशी जोडलेले असते. यामुळेच रेपो दरात कोणताही बदल केल्यास गृहकर्जाच्या व्याजदरावर परिणाम होतो. रेपो दरात वाढ झाल्याने आता गृहकर्जाचा हप्ता ही वाढला आहे. तसेच, एमसीएलआर, बेस रेट आणि बीपीएलआरशी जोडलेल्या जुन्या गृहकर्जांवरही त्याचा परिणाम होईल. मे महिन्यापासून रेपो दरात १९० बेसिस पॉईंट्सची वाढ करण्यात आली आहे. रेपो रेट वाढल्यामुळे गृह कर्जाचे ईएमआय अधिक महाग होतील. ज्या बँकेकडून तुम्ही गृहकर्ज घेतले आहे, त्या बँकेचा गृहकर्ज दर पूर्वी ८.१० टक्के होता आणि तुम्ही हे कर्ज २० वर्षांच्या कालावधीसाठी घेतले आहे. अशा परिस्थितीत, पूर्वी तुम्हाला ३० लाख रुपयांच्या कर्जावर २५,२८० रुपये ईएमआय भरावे लागत होते, परंतु आता तुम्हाला २६,२२५




रुपये द्यावे लागतील. त्याचप्रमाणे, जर तुमचे कर्ज ५० लाख रुपये किंवा १ कोटी रुपये असेल, तर चार्टमध्ये पहा की तुम्हाला पूर्वीच्या तुलनेत आता किती पैसे भरावे लागतील. यावेळी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात ५० बेसिस पॉईंट्स म्हणजेच ०.५० टक्के वाढ केली आहे. रेपो दर वाढल्याचा सरळ अर्थ असा आहे की, बँकांना रिझर्व्ह बँकेकडून जास्त दराने कर्ज मिळेल. अशा परिस्थितीत, बँका ही वाढ ग्राहकांना हस्तांतरित करतात, ज्यामुळे त्यांच्यासाठी कर्जाचे दर देखील महाग होतात. यामुळे केवळ नवीन कर्जे महाग होतातच सोबतच पूर्वीपासून चालू असलेले गृहकर्ज किंवा वाहन कर्ज यांचा ईएमआयही वाढतो. याचा वैयक्तिक कर्जाच्या ईएमआयवर परिणाम होणार नसला तरी नवीन वैयक्तिक कर्जे महाग होतील. जर एखाद्याने सात वर्षांसाठी ८ लाखांचे वाहन कर्ज घेतले असेल तर व्याजदर ११ टक्क्यांवरून ११.५० टक्क्यांपर्यंत वाढेल. यामुळे १३,६९८ रुपयांवरून १३,९०९ रुपयांपर्यंत हप्ता वाढेल. म्हणजेच कर्ज २११ रुपयांनी वाढणार आहे. त्याचप्रमाणे, जर एखाद्याने पाच वर्षांसाठी ५ लाख रुपयांचे कर्ज घेतले असेल तर त्याचा व्याजदर १५ टक्क्यांवरून १५.५० टक्के होईल. त्याला आता ११,८९५ रुपयांऐवजी १२,०२७ रुपये द्यावे लागतील. म्हणजेच त्याचा मासिक हप्ता १३२ रुपयांनी वाढणार आहे.

# टक्केवारी खपवून घेतली जाणार नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात सत्तांतर झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक लोकप्रिय निर्णय घेतले. दोन वर्षांनी पुन्हा विधानसभेच्या निवडणुका लागणार आहे. राज्यातील राजकीय समीकरणे बदललेली असताना शिंदे गट-भाजपा तसेच विरोधकांकडून या निवडणुकीसाठी तयारी करण्यात येत आहे. असे असताना आपल्याला आगामी दोन वर्षांत राज्यात बदल करून दाखवायचा आहे. एखादा अधिकारी किंवा लोकप्रतिनिधीन कोणत्याही प्रकल्पामागे टक्केवारी मागत असेल, तर खपवून घेतले जाणार नाही. कोणी लाच मागत असतील तर थेट मुख्यमंत्र्यांना सांगा, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील उपस्थित होते.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकासाच्या मार्गामध्ये कोणालाही अडथळा आणू देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतलेली आहे. टक्केवारीसाठी प्रकल्प अडवून ठेवले जात असतील, तर खपवून घेतले जाणार नाही. आमदाराने टक्केवारी मागितली तर मुख्यमंत्र्यांना सांगा किंवा अधिकारी टक्केवारी मागत असतील तर लोकप्रतिनिधींनी मुख्यमंत्र्यांना त्याची माहिती द्यावी. पण हा प्रकार बंद झाला पाहिजे. आपल्याला दोन वर्षांत बदल करून दाखवायचा आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दरम्यान, राज्यात आर्थिक गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर सातत्याने आरोप करत आहेत. आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपाखाली राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख, नवाब मलिक, शिवसेनेचे नेते संजय राऊत यासारख्या नेत्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तर दुसरीकडे बंडखोरी करण्यासाठी आमदारांना पैसे देण्यात आले, असा आरोप विरोधकांकडून केला जातोय. सत्ताधारी आणि विरोधातील नेतेमंडळी आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून एकमेकांवर टीका करत असताना लोकप्रतिनिधी किंवा शासकीय अधिकारी प्रकल्पांमध्ये टक्केवारी मागत असतील, तर ते खपवून घेतले जाणार नाही, या फडणवीसांच्या विधानाला महत्त्व आले आहे.

# शिंदे समर्थक शिलेदारांच्या मतदारसंघावर भाजपचा डोळा : राष्ट्रवादी आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ठाणे जिल्ह्यातील ओवळा माजीवाडा, कल्याण पश्चिम आणि अंबरनाथ या मतदारसंघावर भाजपचा डोळा आहे म्हणूनच एकनाथ शिंदेवर भाजप दबाव टाकत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे.



ओवळा माजीवाडा मतदारसंघ बंडखोर आमदार प्रताप सरनाईक यांचा आहे मात्र हा आणि इतर दोन मतदारसंघ भाजपला हवे असून त्यादृष्टीने भाजप रणनीती आखत असल्याचे महेश तपासे म्हणाले. मध्यंतरी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी या तिन्ही मतदारसंघात भाजपचे मेळावे घेतले होते त्याचवेळी कल्याण लोकसभा मतदारसंघावर भाजप डोळा ठेवल्याचे बातम्या आल्या होत्या. आता ओवळा माजीवाडा, कल्याण पश्चिम आणि अंबरनाथ हे तिन्ही मतदारसंघ भाजपला हवे असून त्यात प्रताप सरनाईक यांच्या मतदारसंघाची डील झाल्याने एकनाथ शिंदे व प्रताप सरनाईक यांच्यात धुसफूस झाल्याच्या बातम्या वृत्तवाहिन्यांवर दाखवल्या जात आहेत असेही महेश तपासे म्हणाले. शिवसेनेशी गद्दारी करुन भाजपसोबत संसार थाटलेल्या एकनाथ शिंदे व त्यांच्या बंडखोर आमदारांच्या मतदारसंघावर भाजपची वक्रदृष्टी पडली असल्याने ही धुसफूस वाढत जाणार आहे शिवाय शिवसेना सोडून चूक केली असा पश्चाताप त्या आमदारांना करावा लागणार आहे असा दावाही महेश तपासे यांनी केला.

# महिला आमदाराला भेटण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे थेट रुग्णालयात

## शिवसेना आमदार यामिनी जाधव कर्करोगाने ग्रस्त : मुंबईतील सैफी रुग्णालयात उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईमधील सैफी रुग्णालयामध्ये जाऊन कर्करोगाशी झुंज देणाऱ्या शिवसेनेच्या आमदार यामिनी जाधव यांची भेट घेतली. मुख्यमंत्री शिंदे यांनीच या भेटीसंदर्भातील काही फोटो आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन पोस्ट केले आहेत.

मुख्यमंत्री शिंदे यांनी जाधव यांची काल भेट घेतल्याची माहिती इन्स्टाग्रामवरील पोस्टमधून दिली आहे. शिवसेना आमदार यामिनी जाधव या कर्करोगाने ग्रस्त असल्याने त्यांच्यावर मुंबईतील सैफी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गुरुवारी त्यांची रुग्णालयात जाऊन भेट घेत त्यांच्या तब्येतीची आस्थेने विचारपूस केली, असे शिंदे यांनी या भेटीचे फोटो शेअर करताना म्हटले आहे. शिंदे यांनी या भेटीदरम्यान जाधव यांच्यावर उपचार करत असणाऱ्या डॉक्टरांसोबत त्यांच्या प्रकृतीबद्दल चर्चा केली आणि त्यांच्यावर सुरु असणाऱ्या उपचारांबद्दलची सविस्तर माहिती घेतली. याबद्दलचाही उल्लेख मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे. तसेच या वेळी यामिनी जाधव यांच्यासोबत काय बोलणे झाले याबद्दलची माहितीही मुख्यमंत्री शिंदेंनी पोस्टमधून दिली आहे. "सकारात्मक विचार बाळगून या दुर्धर आजाराशी सामना करावा अशी विनंती यामिनीताईंना केली. तसेच आई दुर्गेश्वरीच्या आशीर्वादाने आपण लवकरच पूर्णपणे बऱ्या होऊन पुन्हा एकदा संपूर्ण क्षमतेने कार्यरत व्हाल असे देखील त्यांना आश्वस्त केले, असे शिंदेंनी पोस्टमध्ये म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी जाधव यांची भेट घेतली त्यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना आमदार प्रकाश आबिटकर आणि शिवसेना नेते आणि यामिनी यांचे पती यशवंत जाधव हे देखील उपस्थित होते. यामिनी आणि त्यांचे पती हे शिंदे समर्थक आमदार आहेत. बंडखोरीनंतर एका मुलाखतीमध्ये यामिनी यांनी उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाबद्दल बोलताना कॅन्सरशी लढा देणाऱ्या आपल्या आमदाराची साधी विचारपुसही पक्षप्रमुखांकडून करण्यात आली आहे, असे म्हणत खंत व्यक्त केलेली.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# महिलांचा आंदोलनातील सहभाग - अशिक्षित किंकरी देवीचे योगदान

आधुनिक केसरी

पण सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालावर शिक्कामोर्तब केले आणि किंकरी देवीचा विजय झाला. १९९५ मध्ये बीजिंगला आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत किंकरी देवीला बोलावून तिचा सन्मान करण्यात आला. अमेरिकेच्या प्रथम महिला नागरिक असलेल्या हिलरी क्लिंटन यांच्या हस्ते किंकरी देवीला सन्मानित करण्यात आले. किंकरी देवीने दिलेल्या या असामान्य लढ्याबद्दल झाशीची राणी शक्ती पुरस्कार देऊन त्यांना १९९९ मध्ये गौरवण्यात आले. किंकरी देवी स्वतः जरी अशिक्षित असली तरी शिक्षणाचे महत्व जाणून होती. आपल्याला परिस्थितीमुळे जरी शिक्षण



एक लढा असाही (भाग-5)

घेता आले नाही तरी समाजातील कोणताही घटक शिक्षणापासून वंचित राहू नये अशी तिची इच्छा होती. त्यासाठी आपल्या गावात महाविद्यालय स्थापन व्हावे ही तिची धडपड होती. आणि त्या धडपडीला यश आले. २००६ मध्ये तिच्या गावात महाविद्यालय सुरु झाले. २००७ मध्ये किंकरी देवींचे निधन झाले. एक अशिक्षित स्त्री देखील ठरवलं तर काय करू शकते हे तिने तिच्या उदाहरणाने जगाला दाखवून दिले. लाखो लोकांच्या मनात पर्यावरण प्रेमाची आणि शिक्षणाच्या आवश्यकतेची जाणीव तिने जागृत केली. संगडाह या गावात तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ ' किंकरी देवी स्मृती पार्कची ' उभारणी करण्यात आली आहे.




# आनंदी पहाट

## मैत्री मनाला आश्वस्त करणारं रसायन

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. काहीवेळा तर "तुझं माझं जमेना पण तुझ्याविना करमेना", अशी गत ह्या मैत्रीच्या बाबतीत झाल्याचे आपण अगदी प्रत्येकजणच अनुभवत असतो. एकही क्षण ज्या मित्र-मंडळींशिवाय जात नाही, तेच काही वेळा केवळ सगे-सोबती ठरतात. अनेकांशी दीर्घकाळ संपर्कच होत नाही. आपल्या आयुष्याची दोरी आपल्या मित्रांच्या हातात देताना अगोदर चांगले मित्र निवडणे, त्यांची चांगली पारख करण्याची जाणीव होणे जरुरीचे असते.

आपल्या मैत्रीचे नाते प्रत्येक सुख-दुःखांत मनापासून सहभागी होत असल्याने मनाला आश्वस्त करणारे ते एक निराळे "रसायन" असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचे आणि जिव्हाळ्याचे नाते म्हणजे आपली परस्परांशी असलेली मैत्री. या मैत्रीचा थेट संबंध आपल्या भाव-भावनांशी आणि आपल्या आवडी-निवडीशी देखील असतो.



आधुनिक केसरी

## दिसे विटेवरी | आत्मरूप ||

मनीचे तरंग | आत्ममग्न व्हावे ||
अंतरी रूजावे शांतीब्रह्म ||१||

एकांती घडावा | आत्म्याशी संवाद ||
आणिकांशी वाद | नको जीवा ||२||

तुटता तुटेना | पाश विकारांचा ||
त्यात संसाराचा | घोळ सारा ||३||

पिढीजात दुःख | जहागिरी माझी ||
काळा भीती तुझी | कैसी सांग ||४||

एकतारी गुंजे | देहाच्या गाभारी ||
दिसे विटेवरी | आत्मरूप ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरूपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं वादविवादनाशिनि।**
**बुद्धिसिद्धिप्रदे देवि नमो नमो नमो नमः।। ३० ।।**
वाद आणि विवादांचा नाश करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. बुद्धी आणि सिद्धी देणारे, देवी, तुला वारंवार नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यमेकवीरे जयप्रदे।**
**खड्गहस्ते नमस्तुभ्यं चण्डिके ते नमो नमः।। ३१ ।।**
एकवीरे, जय देणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. हाती खड्ग धारण करणारे तुला नमस्कार असो. चंडिके, तुला नमस्कार असो.

# नवरात्राची सहावी माळ



आधुनिक केसरी

आज देवीची सहावी माळ. सहाव्या माळेतील एक एक पुष्प गुंफत मातेचे रूप आपण डोळ्यात साठवूया.
षष्ठीचे दिवशी भक्ता आनंद वर्तला हो।
घेऊन दिवट्या हस्ती हर्षे गोंधळ घातला हो।
नवरात्र हा लोकसंस्कृतीचा ऊत्सव आहे. भक्तांना आनंद झाला आहे. हातात दिवट्या घेऊन नाचत गात भक्त ज्ञान व वैराग्याचा जोगवा मागत आहेत.

**कवडीदेवी**

काशीक्षेत्री कवडी देवी आहे. या देवीला कवडी अर्पण करतात. असे म्हणतात की आपले आयष्य कवडीमोल आहे. या मिळालेल्या आयुष्याचे सोने करणे आपल्या हातात आहे. आणि याची सतत जाणीव असणे गरजेचे आहे म्हणून भक्त गळ्यात कवड्याची माळ घालतात.
"कवडी एक अर्पिता देसी हार मुक्ता फळा हो ।
जोगवा मागता प्रसन्न झाली भक्तकुळा हो"।।
असे हे कवडीचे अनुपम मोल आहे.
मानवी जीवनात शुभप्रसंगी जी रंगत वाजंत्री, ढोलताशे,
चौघडे वाजंत्री, शांतस्वराने येते त्याचे सुर कानाला हवेहवेसे वाटतात आणि वातावरणात एक प्रकारचे पावित्र्य निर्माण होते तेवढीच रंगत गोंधळ घालताना जो संबळ वाजवला जातो जे तुणतुण वाजवलं जाते त्यांच्या सुरांनी या लोकगीतात येते. हा तर आपला सांस्कृतिक ठेवा आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मशालीची जळती पोत हातात घेऊन व मशालीत तेल घालण्यासाठी असलेला बुधला घेऊन जेव्हा गोंधळी देवीचा जागर करतो ,देवीला भक्ताकडे येण्याचं आवाहन करतो तो क्षण भक्ताच्या भक्तिचा परमोच्च क्षण असतो. गोंधळी काही राजा नसतो पण तो एक कष्टकरी सर्व सामान्य माणूस असतो तो देवीला छत्रचामरे,माणीक मोती देऊ शकत नाही पण त्याची देवीप्रती भक्ति व आर्तता एवढी मोठी असते की माता त्याला आशिर्वाद द्यायला नक्कीच येते.
भक्त काय म्हणतो बघा हं
माझ्या मातीच्या कुडाच्या भिंती असलेल्या झोपडीत तु ये.बसायला साधी घोंगडी आणि भाजीभाकरीचा नैवेद्य मी तुला अर्पण करतो. पण त्रैलोक्याचा सांभाळ करणारी ही ऐश्वर्यसंपन्न माता पण ती गोंधळाला येते. भक्ताच्या भाजीभाकरीचा प्रसाद सेवन करते साध्यासुध्या घोंगडीवर बसते,भक्ताच्या घरच्या परडीचा सांभाळते त्याच्या घरच्या गुळपाण्यानेही प्रसन्न होते. त्याच्या साध्याभोळ्या आदरातिथ्याने प्रसन्न होते. भक्तिचा जोगवा घेणारी आणि देणारी अशी ही अन्नपूर्णेच्या रूपात समस्त प्राणी मात्रांचं रक्षण करते. रावापासुन रंकाचे पोट भरणारी ही शाकंभरी आहे. शत्रुनाशिन्यै आहे धीर देणारी आहे व धीर धरायला लावणारी आहे. आरोग्य,धनधान्य, सुखशांती, संपत्ती देणारी सर्व प्राणीमात्रांचे मंगल करणारी महालक्ष्मीला माझा नमस्कार असो.
सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्यं त्रंबकेगौरी नारायणी नमस्तुते।।

# सहावी माळ अमरावतीची "श्रीअंबामाता"

आधुनिक केसरी

आज नवरात्र -उत्सवाची सहावी माळ- आरती मध्ये आजचे वर्णन असे आहे -
"षष्ठीचे दिवशी भक्तां आनंद वर्तला हो |
घेउनी दिवटया हस्ती गोंधळ घातला हो |
कवडी एक अर्पिता देसी हार मुक्ताफळा हो |
जोगवा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो |
उदो बोला उदो बोला .अंबाबाई माउलीचा हो |
आईच्या येणाचा आनंद ,तिची सेवा केल्याचा आनंद शब्दातीत आहे, भजन, जागरण, गोंधळ आणि जोगवा हे सगळ आईच्या दरबारात याची देहा याची डोळा पहायला मिळणे हा आपल्या भाग्यातला मोठाच पुण्यप्रद योग आहे, ही जशी माझी भावना आहे, तशी ती तुमच्या मनातही आहे याची मला कल्पना आहे. आपण नशीबवान आहोत हीच खरी आईची कृपा आहे म्हणून तर ..ओठी असते आईचे नाम सदा ...! मनाची अशी ही अवस्था उगीच्या उगीच होत नसते मित्रांनो.
आपल्या महाराराष्ट्रात देवी -स्थान म्हणून प्रख्यात असलेली अनेक शहरे -गावं ,आणि खेडी आहेत. कुठे जा आई अम्बाबाई भक्ताच्या नजरेस पडते. असेच एक सर्व परिचित शहर आहे -अमरावती. येथील अंबामाता मंदिर आणि एकवीरा देवी मंदिर म्हणजे आई अंबाबाईच्या भक्तांची श्रद्धा स्थाने आहेत.

मराठवाड्यातील असलेले आम्ही विदर्भात जाण्याचा योग आला तो १९९३ सालापासून. त्यावर्षी पत्नीच्या धाकट्या बहिणीचा मंजुषा बसोले -हिंगोली हिचा विवाह परतवाडा निवासी खजुरकर -संजय यांच्याशी झाला. खजूरकर परिवाराकडे गेलो की आम्हाला चिखलदरा पहायला -जायला मिळे. योगायोगाने माझे हे साडू-बंधू श्री. संजय वन विभगात नोकरीस होते. चिखलदरा भराभरा न पाहत निवांतपणे पहायला मिळत असे. २००२ पासून खजुरकर परिवार अमरावती निवासी झाल्यापासून आम्हला या छान शहरास जायला मिळते आहे. ते राजापेठ मध्ये राहतात आणि त्यांच्या घरापासून देवीचे मंदिर अगदी जवळच आहे. मग काय अमरावतीच्या मुक्कामात अंबामाता आणि एकवीरा या दोन्ही देवींच्या दर्शनासाठी जाणे होते.
जगदंबेचे हे मंदिर अतिप्राचीन असल्याचे सांगितले जाते. बाजूबाजूला असलेली ही दोन मंदिरे आणि संपूर्ण परिसर कधीही जावे गजबजलेला दिसतो. अगोदर दर्शन घायचे असते ते अंबामातेचे. भव्य मंदिर, आत प्रसन्न वातावरण.
अंबामाता मूर्ती पाहून मनास खूप समाधान मिळते. क्षणभर बसूया असे वाटून आपण इथे इतके तल्लीन होऊन जातो की मूर्तीसमोर हात जोडून बसल्यावर उठून जाण्याचे भान पण राहत नाही. अंबामातेच्या मंदिरा बाहेर आले कि भक्तांच्या गर्दीत आपण सहजपणे मिसळून जात एकवीरा मंदिरात प्रवेश करतो.

### जागर देवी दर्शनाचा



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

ही एकवीरा माता माहूरच्या रेणुकामातेचे स्थान -रूप मानले जाते. जगदंबेचे हे मंदिर अतिप्राचीन असल्याचे सांगितले जाते. अमरावतीचा नवरात्र -उत्सव भक्तांसाठी भक्तीची पर्वणी असते.. ंबामाता आणि एकवीरा देवींचा नवरात्र -उत्सव विदर्भातीलच नव्हे तर या ठिकाणी येऊन गेलेलेया, दर्शन घेतलेल्या प्रत्येकला खूप महत्वाचा वाटतो. जागर-देवी दर्शनाचा "यात अमरावतीच्या दर्शन आठवणी येणारच ..!

**आजची स्वलिखित रचना -**
**श्रीआंबामाता -अमरावती**

सहावी माळ आज नवरात्रीची हो
आई जगदंबेचे नाव सारे घेऊ
सकल विश्वाचे कल्याण करिते
आईच्या चरणी नतमस्तक होऊ ।।
चला आज अमरावती नगरी जाऊ
अंबामाता संस्थान विख्यात ते पाहू
अंबामातेच्या चरणी सकल इच्छा

# बुडत्या काँग्रेसच्या आधाराने शिल्लक सेना वाचविण्याची धडपड

## भारत जोडोच्या मदतीच्या मोबदल्यात दसरा मेळाव्यासाठी काँग्रेसी गर्दीची तडजोड : केशव उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातून अस्तित्व पुसले जाण्याच्या भीतीने उद्धव ठाकरे यांच्या पायाखालची वाळू सरकू लागली असून बुडत्या काँग्रेसला वाचविण्यासाठी शिल्लक सेनेचा हात पुढे करण्याची ठाकरे यांची तडजोड आता दोन्ही पक्षांना बुडविणार आहे, अशी घणाघाती टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. शिवाजी पार्कवरच्या मेळाव्यास गर्दी जमविण्यासाठी काँग्रेसने कार्यकर्ते पुरविण्याच्या मोबदल्यात राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेसाठी महाराष्ट्रातील शिल्लक सेनेची कुमक पुरविण्याची ठाकरे यांची धडपड केविलवाणी असून आता पेंग्विन सेनेने हिंदुत्वाशी कायमची फारकत घेतल्याचे स्पष्ट झाले आहे, असा आरोपही त्यांनी केला. दसरा मेळाव्याकरिता गर्दी जमविण्याचे अभूतपूर्व आव्हान ठाकरे यांच्यासमोर उभे असल्याने उरल्यासुरल्या पेंग्विन सेनेच्या आवाक्याबाहेरच्या या आव्हानास सामोरे जाऊन लाज वाचविण्यासाठी ठाकरे यांची जोरदार धडपड सुरू आहे. त्यासाठी त्यांनी शिल्लक सेनादेखील काँग्रेसच्या दावणीला बांधून इतिहासाची पुनरावृत्ती केली आहे. अगोदर राष्ट्रवादी काँग्रेसपुढे गुडघे टेकल्याने ठाकरे यांचे नेतृत्व संपले, आता काँग्रेसच्या वळचणीस जाऊन उरलीसुरली सेना संपविण्याचा त्यांचा इरादा स्पष्ट झाला आहे. विश्वासघाताने, जनादेश धुडकावून मिळविलेले मुख्यमंत्रीपद टिकविण्याच्या धडपडीतून राष्ट्रवादी काँग्रेसकडे पक्ष गहाण टाकून त्यांनी अगोदर शिवसेनेची विल्हेवाट लावली. आता शिवाजी पार्कवरील मेळाव्याचा फज्जा उडण्याच्या भीतीने त्यांनी काँग्रेसच्या कुबड्या घेतल्या आहेत. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेचा महाराष्ट्रात फज्जा उडणार याची जाणीव असल्याने काँग्रेसने 'गांधी यात्रे'ची लाज वाचविण्यासाठी सैनिकांची कुमक देण्याच्या अटीवर ठाकरे यांच्या मेळाव्यासाठी गर्दी पुरविण्याची ग्वाही दिली आहे, असा गौप्यस्फोट उपाध्ये यांनी केला. मुख्यमंत्रीपदाची हाव आणि पुत्रप्रेमाच्या लालसेपोटी बाळासाहेब ठाकरे यांचा संपूर्ण पक्ष पणाला लावणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचे भवितव्यच या मेळाव्यातील शक्तिप्रदर्शनावरच अवलंबून असल्याने काँग्रेसने त्यांना कोंडीत पकडले आहे. बाळासाहेबांच्या पक्षाची त्यांच्या कौटुंबिक वारसाने केलेली केविलवाणी अवस्था पाहून कीव येते, असेही त्यांनी नमूद केले. ठाकरे यांनी २०१९ मध्ये जनादेशाचे पालन केले असते, तर आपल्या हाताने पक्षाच्या विसर्जनाची वेळ त्यांच्यावर आली नसती, असा टोलाही उपाध्ये यांनी लगावला.

ठाकरे गटाच्या शिवाजी पार्कवरील मेळाव्याची हवा अगोदरच निघून गेली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईचा वापर करून गर्दीसमोर वल्गना करण्यापलीकडे राज्याचे नेतृत्व करण्याची ठाकरे यांची क्षमता नाही, हे त्यांनी स्वतःच अडीच वर्षांच्या सत्ताकाळात दाखवून दिले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या कुबड्यांखेरीज पक्षाचे अस्तित्व टिकविणे शक्य नाही याची जाणीव झाल्यामुळेच उरतणीला लागलेल्या या पक्षांच्या आधाराने उरलासुरला गट टिकविण्याची धडपड संपूर्ण महाराष्ट्र पाहात आहे, असेही ते म्हणाले.

# राज्यात केरळच्या धर्तीवर वन व्हिलेज वन ऑफिसर संकल्पना राबवावी

## राज्याध्यक्ष नितीन धामणे



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** महाराष्ट्र राज्याचे मुख्यसचिव मनुकुमार श्रीवास्तव यांचे अध्यक्षतेखालील पी एम किसान सन्मान योजना, पीक कापणी प्रयोग, महसूल, कृषी व ग्रामविकास विभागाच्या समन्वयाने राबिण्यात येणाऱ्या योजनांवर ग्रामसेवक संवर्गाच्या तिन्ही संघटनांनी काम नाकारल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यसचिव यांचे कक्षात तिन्ही संघटनाची बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीमध्ये ग्रामसेवक संघटनांनी ग्रामसेवकावर लादलेल्या इतर विभागाच्या अतिरिक्त कामकाजाबाबत एकमुखी ठामपणे नकार देऊन ग्रामसेवकांना ग्रामविकास विभागाकडील १८२ योजना, १४ विविध समित्यांचे सचिव, विविध अभियान, स्पर्धा प्रत्येक जिल्ह्यातील मुकाअ यांचे जिव्हाळ्याचे या मुळे ग्रामसेवक ग्रामसेवक संवर्ग पूर्णतः त्रासला असून ग्रामसेवकांचे मानसिक खच्चीकरण या बाबत विविध मुद्दे मांडून बैठकीमध्ये काम करण्यास नकार दिला परंतु सदर बैठकीमध्ये माननीय मुख्यसचिव मनुकुमार वास्तवसाहेब, महसूल सचिव नितीन करीरसाहेब, कृषी सचिव एकनाथ डवले साहेब यांनी सदरचे काम हे राष्ट्रीय काम असून सदरचे धोरणात्मक काम आहे त्यामुळे काम नाकारणे योग्य होणार असे आवाहन केले त्यावर तिन्ही विभागांना समप्रमाणात (३३% ) या प्रमाणात काम करावे हा मध्यम मार्ग काढला. सदर बैठकीमध्ये महसूल व कृषी विभागाचे मूळ काम असताना नाकारले जात असून ग्रामसेवक संवर्गावर लादणे हा अन्याय आहे. यावर संघटना पदाधिकारी यांनी ठामपणे आपली बाजू मांडली. याबैठकीमधे सदर काम ग्रामसेकांकडून करावयाचे असल्यास त्यांना तांत्रिक दर्जा द्यावा लागेल अशी मागणी राज्याध्यक्ष नितीन धामणे यांनी ठामपणे मांडली व ग्रामविकास विभागात कार्यरत असलेल्या ग्रामसेवकांना कृषी विभागाने तांत्रिक अधिकार देऊन वेतन देण्याबाबत मागणी केली. ग्रामसेवक, कृषि सहायक, तलाठी यांचे सेवाविषयक बाबी यांचा तुलात्मकदृष्ट्या अभ्यास करून वन व्हीलेज वन ऑफिसर ही संकल्पना समोर आली म्हणजे एका गावात ग्रामविकास महसूल व कृषी या सर्व विभागाची कामे एकाच कर्मचारी यांचेकडून करणेबाबत पुढे आली ग्रामसेवक संवर्गाच्या विविध अडीअडचणी व प्रलंबित मागण्या बाबत ग्रामविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या समवेत सविस्तर विषयवार बैठक लावण्याचे मान्य केले यावेळी ग्रामसेवक संघटनेच्या राज्य पदाधिकाऱ्यांनी माननीय मुख्यसचिव साहेब यांच्याकडे सविस्तर मागण्यांचा ड्राफ्ट सादर केला यावेळी राज्यसचिव हरिश्चंद्र काळे, कार्याध्यक्ष नवनाथ झोळ, महेंद्र निकम कोषाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

# स्वर्गीय दत्ता मोरे यांच्या स्मरणार्थ मुकुंदादेवी संस्थानला टीव्हीसंच भेट

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील मांजरी येथील श्री मुकुंदा देवी मंदिर हे अतिशय जागृत देवस्थान असून मुकुंदा देवी दर्शनासाठी नवरात्र उत्सवामध्ये परिसरातील लाखो भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात नवरात्र काळात सकाळी सकाळी गंगापूर, वाहेगाव नेवरगाव व आजूबाजूच्या परिसरातील अनेक भाविक भक्त महिला व पुरुष या ठिकाणी पायी येत असतात यानिमित्ताने रोज सकाळी सात वाजता व सायंकाळी सहा वाजता मंदिरामध्ये आरती होते मंदिरामध्ये आरती होत असताना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने मंदिरातील मुख्य गाभाऱ्यातील देवीच्या मूर्तीचे दर्शन भाविकांना मिळत नसल्याने श्री मुकुंदादेवी संस्थान माहुलीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना कळविले की या ठिकाणी जर एलईडी लावली तर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून सर्व भाविक भक्तांना आरतीच्या वेळी मुख्य गाभाऱ्यातील देवीच्या मूर्तीचे आरतीच्या वेळी दर्शन घेता येईल व प्रत्यक्ष आरती त्या ठिकाणी बघता येईल असे कळवले लगेच श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय दत्ता मोरे यांच्या स्मरणार्थ या ठिकाणी 50 इंची एलईडी टीव्ही भाविकांना मातेचे दर्शन व्हावं यासाठी सस्नेह भेट देण्यात आला यावेळी स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगापूरचे सचिव डॉ. आबासाहेब शिरसाठ श्रीकांत कुमावत, संतोष खाडे, मनीष पाटील, पवन परीहार, प्रसाद कुलकर्णी, आनंद टिळे, कमलेश जगताप, दीपक कुलकर्णी, प्रताप राजपूत, प्रमोद महाजन, गणेश चव्हाण, मुकुंद पाटील, नवनाथ कानडे, करण खोमणे यांनी मुकुंदा देवी ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती अंजलीताई कसाने सरपंच मांजरी, सचिव देविदास रत्नपारखी, शिवाजी लांडे, अशोक साळुंके, संदीप कुलकर्णी, दादासाहेब सुंब, अप्पासाहेब मिसाळ सर, पोलीस पाटील दिगंबर दारून्टे, कैलास घोडके,नटेश्वर लांडे, साहेबराव सोनवणे यांची उपस्थिती.




# दाक्षिणात्य अभिनेता चिरंजीवी राजकारणात पुन्हा सक्रिय होणार ?

आधुनिक केसरी न्यूज

**अनंतपूर :** दाक्षिणात्य अभिनेता मेगास्टार चिरंजीवी यांनी मला राजकारणापासून दूर राहायचे आहे. पण राजकारण माझ्यापासून दूर जात नाहीये, असे विधान करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर जिरंजीवी पुन्हा राजकारणात सक्रिय होणार का? असे विचारले जात आहे.

तेलुगू चित्रपट मेगास्टार के चिरंजीवी यांच्या गॉडफादर या आगामी चित्रपटाचा प्रदर्शनपूर्व कार्यक्रम रायलसीमा प्रदेशातील अनंतपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यानंतरच राजकीय वर्तुळात अनेक चर्चा रंगल्या आहेत. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमध्ये सर्व कार्यक्रम तेलंगाणामधील हैदराबाद किंवा आंध्र प्रदेशमधील विजयवाडा, विशाखापट्टनम येथे आयोजित केले जातात. मात्र जिरिंजीवी यांनी त्यांच्या गॉडफादर या चित्रपट प्रदर्शनापूर्वीचा कार्यक्रम अनंतपूर येथे आयोजित केला होता. चिरंजीवी यांच्या या निर्णयाचेही



अनेकांना आश्चर्य वाटले असून, यामागे त्यांचा काही राजकीय हेतू होता का? असा प्रश्न विचारला जातोय.

केंद्रीय मंत्री राहिलेले के चिरंजीवी अजूनही काँग्रेसचे सदस्य आहेत. काँग्रेसचे सदस्य असले तरी त्यांनी आतापर्यंत स्वतःला सक्रिय राजकारणापासून दूर ठेवलेले आहे. त्यांचे धाकटे बंधू के पवन कल्याण हेदेखील दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमध्ये 'पॉवरस्टार' म्हणून ओळखले जातात. ते जनसेना पार्टी (जेएसपी) या पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. पवन कल्याण मागील काही महिन्यांपासून आंध्र प्रदेशमधील रायलसीमा या भागाचा दौरा करत आहेत. त्यांनी याआधी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अनंतपूरमधून निवडणूक लढवण्याची इच्छा असल्याचे सांगितलेले आहे. असे असताना के चिरंजीवी यांनीदेखील आपल्या चित्रपटाचा पूर्वप्रदर्शनाचा कार्यक्रम अनंतपूर येथेच घेतला आहे. याच कारणामुळे दोघे बंधू युती करून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत एकमेकांना मदत करणार का? असे विचारले जात आहे.

दरम्यान, चिरंजीवी यांनी मला राजकारणापासून दूर जायचे आहे, असे म्हणताच काँग्रेसने त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. ते २०२७ पर्यंत आंध्रप्रदेश काँग्रेसचे सदस्य/ प्रतिनिधी असतील असे काँग्रसने जाहीर केलेले आहे. याअगोदर चिरंजीवी यांनी प्रजा राज्यम पार्टी या पक्षाची स्थापना केली होती. पुढे हा पक्ष त्यांनी बरखास्त केला. आंध्रप्रदेशचे विभाजन झालेले नसताना २००८ साली त्यांच्या पक्षाने १८ जागांवर विजय मिळवला होता.



# मोहन भागवतांचा सल्ला

आधुनिक केसरी

शाकाहार हा मांसाहारापेक्षा श्रेष्ठ असून तो मानवाचा आदर्श आहार आहे, ही भूमिका वैज्ञानिक आणि नैतिक अशा दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून मांडण्यात येते. शाकाहार हा माणसाचा स्वाभाविक आहार आहे. त्याचे शरीरावर होणारे परिणाम आयोग्यदायी आहेत. मानवी शरीराची संपूर्ण रचना शाकाहारासाठीच आहे व वाढत्या हृदयविकाराचे व कर्करोगाचे एक कारण मांसाहार आहे, या बाबी विज्ञानसिद्ध आहेत, असेही म्हटले जाते. तथापि हे सर्व शास्त्रीय पुराव्यांनी सिद्ध करणे अवघड आहे. याउलट शाकाहारात अंतभूर्त असलेले साखर आणि पिष्टमय पदार्थ ह्यांचे सेवन, विशेषत: पिष्ठमय पदार्थांचे अतिरेकी सेवन, हे मांसात आढळणाऱ्या युरिक अम्लाइतकेच अनिष्ट आहे. शाकाहार किती महत्वाचा आहे हे नुकतेच सरसंघचालक मोहन भागवत यांनी सांगितले आहे. कोणीही चुकीचे अन्न खाऊ नये, तसंच हिंसाचाराशी संबंधित अन्न टाळावे असा सल्ला सरसंघचालक मोहन भागवत यांनी दिला आहे. भारत विकास परिषदेच्या पश्चिम क्षेत्राची चिंतन बैठकीत ते बोलत होते. नागपुरातील कविवर्य सुरेश भट सभागृहात ही बैठक गुरुवारी पार पडली. यावेळी त्यांनी व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासावर भाष्य केले. जर तुम्ही चुकीचे अन्न खाल्ले, तर ते तुम्हाला चुकीच्या मार्गावर घेऊन जाईल. कोणीही 'तामसिक' अन्नाचे सेवन करु नये. अती हिंसाचार असणारे अन्न टाळलं पाहिजे, असे मोहन भागवत यांनी सांगितले आहे. तामिसक अन्न म्हणजे यामध्ये मांसाहाराचा समावेश असतो. मोहन भागवत यांनी यावेळी पाश्चिमात्य देशातील आणि भारतातील मांसाहार करणाऱ्यांची तुलनादेखील केली. ते म्हणाले जगातील इतर देशांप्रमाणे भारतातही अनेक लोक मोठ्या प्रमाणात मांसाहार करतात. पण आपल्या देशात मांसाहार कऱणारेही संयम पाळतात आणि काही नियमांचे पालन करतात. आपल्याकडे मांसाहार करणारे लोक श्रावणामध्ये मात्र ते खाणे टाळतात. तसेच सोमवार, मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी ते मांसाहार करत नाहीत. त्यांनी स्वत:साठी काही नियम आखले आहेत, असे मोहन भागवत म्हणाले. भारतीय नागरिक सर्वांनाच आपले मानतो. त्यामुळेच आपण श्रीलंका, मालदीवसारख्या देशांना त्यांच्या अडचणीच्या काळात मदत करतो. युक्रेन युद्धामध्ये अडकलेल्या भारतीयांसोबतच इतर देशातील लोकांची आपण सुटका करतो. भारतीय लोक मर्यादित स्वरूपातच मांसाहार करतात. मात्र पाश्चिमात्य देशात दररोज त्याचं सेवन केलं जातं. त्यांची विकासाची संकल्पना अपयशी ठरली आहे, असेही ते म्हणाले. ते म्हणाले अध्यात्म हा भारताचा आत्मा आहे. श्रीलंका आणि मालदीव अडचणीत असताना इतर देश व्यवसायाची संधी शोधत असताना, भारत मात्र त्यांना मदत करत होता. अहंकाराशिवाय जीवन जगणे हा भारताचा आत्मा आहे, असेही ते म्हणाले. शाकाहार हा निसर्गाचे संतुलन राखणारा व पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणारा आहे. शाकाहारवादामागची नैतिक भूमिका ही मुख्यत: भूतदयेच्या विचारावर आधारलेली आहे. फळे, भाज्या यांचे सेवन करून माणसाला राहता येत असेल, तर प्राणिहत्या का करावी? तसे करण्यात माणसाचा स्वार्थीपणा दिसून येतो. मांसासाठी प्राण्याची हत्या करताना ती शक्य तितकी वेदनारहित होईल, अशी यंत्रणा आधुनिक खाटिकखान्यांतून असते असा दावा केला जात असला, तरी मुळात प्राण्याचा जीव घेऊन त्याचा जगण्याचा हक्क हिरावून घेणे, हेच अनैतिक आहे.



लक्ष्मण वाल्डे
संपर्क क्र. 8888606068

# ग्रामीण विकास : देशाच्या विकासाची दुसरी बाजू

आधुनिक केसरी

**भारतीय संस्कृतीला थोडा वेळ बाजूला ठेवल आणि आर्थिक दृष्ट्या विचार करून देशाच्या विकासाच्या दोन बाजू सांगायच्या झाल्या तर पहिली बाजू म्हणजे शहर आणि उद्योगीक विकास, दुसरी बाजू कृषी आणि ग्रामीण भाग व ग्रामस्थ विकास अशा या देशाच्या विकासाच्या दोन बाजू आहे अशी प्रचीती वाटनं अयोग्य नाही. माझ्या या भारत देशाला जगात कृषीप्रधान देशाची ओळख आणि मानसन्मान असून कृषी आणि ग्रामीण भाग देशाच भूषण आहे. नाक आहे असं समजायला-म्हणायला संकोच मनात वाटू नये असं वाटत. कारण आज आपण जगतोय त्याच खरं श्रेय तर रात्रन-दिवस घाम गाळून अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याला जातो आणि तो जायलाच पाहिजे.**

निस्वार्थ शेतकरी नफा-तोटा न बघता कधीच शेतीच्या कामावरून सुट्टी न मारता आपल काम प्रामाणिकपणे करत असतात.गरिब असो वा श्रीमंत,मोकाट फिरणारी दोन पायाची असो वा चार पायाची. सगळ्याच जीवाला अभयदान-जीवदान देणारा एकमेव आमचा बळीराजा आहे. काही सदन शेतकरी सोडले तर,बाकी शेतकऱ्यांची अजूनही हाल-बेहाल आहे. अजूनही त्यांच्या घरात दारिद्री चिकटून बसली आहे.अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांना राहायला पक्क घर नाही.अजूनही कित्येक पिढ्यांपासून कुडांच्या घरात असेल तसा समाधानाने संसार करतांना दिसताय.आजही त्यांची,त्यांच्या बायका-पोराबाळांच्या अंगावरची कापड फाटकी-तुटकीच दिसून येताय .मोजके शेतकरी सोडले तर अजूनही या विज्ञान युगात शेतकऱ्यांचा आधुनिक शेती विकास झाला नाही.शेती विकास योजनेचा लाभ सगळ्यांच शेतकऱ्यांना मिळतो असेही नाही.अजूनही बरेच शेतकरी शासकीय योजनेपासून वंचित आहे.ग्रामीण भागातील सुख सुविधांचा प्रश्न तर जुनाच आहे.आणि ते प्रश्न नसंपणारे नसुटणारे आहे हे तर मान्य करावेच लागणार आहे. ग्रामीण विकासात ग्रामीण भौतिक-ग्रामीण मुलभूत विकास या सर्वांगीण विकासाची उणिव दिसत आहे.भासत आहे.अशा विविध समस्यात ग्रामीण विकास पोरके होतांना दिसत आहे. त्याच बरोबर गावाच्या नावाच्या प्रचितीच्या विकासाची आणि गावा-गावातल्या बेरोजगारीच्या विकासाचा माणसा-माणसाच्या प्रगतीच्या विकासाचा मोठा प्रश्न आज ग्रामीण विकासा सोबत फडफडतांना दिसतोय. ग्रामीण विकास आणि ग्रामीण भागातील माणसांचा विकास यांच समीकरण मिळत जुळतच आहे.ग्रामीण माणूस आणि त्याची रोजी रोटी विकास अजूनही रखडलेलाच दिसतो.कृषी आणि ग्रामीण भाग व ग्रामस्थ विकास देशाच्या विकासाची दूसरी बाजू आहे हे मात्र नक्की.

आज ग्रामीण भाग विविध गुणवत्तेने टाचून-टाचून भरला आहे. विविध कला कौशल्य ग्रामीण भागत जन्माला येत आहे. साहित्य,संगीत,क्रीडा,डीजीट कौशल्य,अभिनय,इन डोअर खेळ,हस्तकला,पाककला,व्यवसाय,शिक्षण अशा विविध क्षेत्रात ग्रामीण भाग अव्वल नंबरला आहे असं म्हणायला-मान्यकरायला हरकत नसने यात दुमत नाही. ग्रामीण भागामधल्या मुलांमध्ये जुन्या लोकांच्या ज्ञान कौशल्य शक्ती कुणाला अनुवंशिकतेतून मिळाली तर कुणाला आत्मसात करुन मिळालेली आहे.आणि अजूनही ती कला त्यांनी त्यांच्यात आत्मसात करून ठेवली आहे.जसे की शरिराचे कोणतेही मुचकलेले हाड बसवने,बाज( खाट )विणने,आयुर्वेदिक झाड-पाल्यांचे ज्ञान,असे विविध बारीक-मोठी बहूरुपीय गुण कौशल्य ग्रामीण भागात आज जिवंत असण्याच दिसतय.ग्रामीण विकासासोबत ग्रामस्थ कलागुणांचा विकास झाला व्हायला पाहिजे.त्यातून आपोआप ग्रामस्थ विकासाच्या वाटा मोकळ्या होतील आणि देशाच्या विकासाची दूसरी बाजू मजबूत व्हायला मदत होईल. ग्रामीण भागातील या कला गुणांना जगासमोर आणण्यासाठी त्यांना त्यांच्या हक्काचं व्यासपीठ मिळालया हवं.त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी संध्या उपलब्ध व्हायला हव्या.त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळायला हवी.त्यातून त्यांना उदरनिर्वाहाची संधी मिळायला हवी.त्यातून त्यांना अर्थार्जनाचे साह्य व्हायला हवं. ग्रामीण कलावंतांच्या कला,गावच्या वेशीपर्यंत येऊन दम सोडून देतांना दिसताय.आज ग्रामीण भागातील पालकांनाही त्यांच्या मुलांच्या या कलागुणांची वाहवाह वाटत नाही.कारण ते समजता की ,यातून पोटभरत नाही. कामेधंदे करा उगाच फालतूपणा करायचा नाही.अशी शिकवण,दमदाटी मुलांना देत असता असे चित्र-विचित्र अनुभव या ग्रामीण समाजात उठून उमटतांना दिसताय.आपल्यातल्या कला गुणांना करियर मध्ये रुपांतर करण्याची संधी मिळते आणि हीच आवड पुढे तुम्हांला रोजगार उपलब्ध करुन देते.तुमच्या छंदातून तुमचा धंदा उभा राहतो हे आमच्या ग्रामीण भागाला शहरांनी कधी सांगितलच नाही.म्हणून आमचा ग्रामीण भाग गुण कौशल्य विकासातही मागासलेला राहिला आहे.आज आमचे ग्रामीण पोर-पोरी सोशल मीडियाच्या माध्यमातून यूट्यूबवर आपलं कला-कौशल्य दाखवून त्यात करियर करतांना दिसु लागली आहे.त्यातून भरगच्च पैसा कमवतांना दिसत आहे.अशा वेगवेगळ्या सोशल मीडियाच्या माध्यमातून ॲप्स मधून पैसे कमवितांना दिसत आहे.शिकून किंवा अभ्यास करुन नोकरी जरी मिळाली नाही तर हताश न होता.आपल्यात असलेल्या टॅलेंटला ओळखून त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रचार-प्रसार करायला लागलेली दिसताय आणि जनता त्यांच्या कला गुणांना वाव देतांना दिसतीये.शहर जरी आपल्या ग्रामीण भागातल्या मुलांना चित्रपटात जाण्याचा मार्ग सापडू देत नसले तरी तोच मार्ग आमचा ग्रामीण भागत आमच्या कला गुणांना शोधत येईल.आणि चित्रपट वाल्यांनकडे आपल्या ग्रामीण भागाचा वशिला जरी लागला नाही तरी आमच्या ग्रामीण भाग स्वःताच्या मेहनतीच्या बळावर सोशल मिडियावर स्टार होतांना आज दिसताय.आज सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांनी खऱ्या कलाकारांना पुढे नेण्याचा मानस बघायला मिळतोय. ग्रामीण भागांना पुढे नेण्यासाठी,नविन होतकरू,शिक्षित,नव तरुणांना संधी दिली पाहिजे असं वाटतं.राजकारण असो वा कला-क्रिडा-संगित-हस्तकला-पाककला-व्यवसाय-डीजीटल कौशल्य -अभिनय-इन डोअर खेळ यांचा सगळ्यांचा उद्दार करायला अनुभवी व्यक्ती आणि नव तरुणांच्या हातात सुत्र द्यायला हवी.ते या कला संस्कृतीला पुढे नेतील.सगळ्यांना त्यांच्या कलागुणांच्या कौशल्यावर काम मिळेल नोकऱ्या मिळतील.मग आपोआप बेरोजगारी संपुष्टात येईल.आणि गावा-गावांना चालना मिळेल. गावा-गावांचा विकास होईल आणि माझ्या देशाची दुसरी बाजूही सक्षम होईल.शहरांच्या बरोबरीला गावे धावायला लागतील त्या दिवशी खऱ्या अर्थाने माझ्या देशातली गरीबी संपुष्टात येईल आणि माझ्या देशाचा विकास जोमाने होईल.शहराच्या धावत्या जिवनाकडे पाहून आज ग्रामीण भाग व ग्रामस्थ कौशल्य एकमेव असा पर्याय दिसतोय की देशाच्या विकासाला आणि महासत्ताक बनवायला ग्रामस्थ मुला-मुलीचा काही पालकांचा,अनुभवी कलागुण संपन्न ग्रामस्थांच्या टॅलेंटचा सिंहांचा वाटा असणार आहे.हे तेवढच खरं.लाथ मारु तिथे पाणी काढू एवढी धमक ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मनगटामध्ये आणि विद्यार्थ्यांनच्या नि ग्रामस्थांच्या विविधांगी टॅलेंट मध्ये आहे.हे कडू सत्य मान्य करायला हरकत नाही.तेव्हा खऱ्या अर्थाने कृषी आणि ग्रामीण विकास व ग्रामस्थ विकास देशाच्या विकासाच्या दुसऱ्या बाजूत परिवर्तीत झाल्याचे दिसून येईल.






श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# महाराष्ट्राचे वाल्मीकी गदिमा

आधुनिक केसरी

**मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०३ वि जयंती. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

१ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी



केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# माळेत अडकलेला हत्ती



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**काल सहज मुलाच्या शाळेतील गृपवर निमंत्रण आले, की उद्या शाळेत महिला पालक भोंडला आयोजित केला आहे. महिला पालकांनी पारंपरिक वेशभूषा करून येणे. आणि नकळत त्या दिवसात हरवून गेले. श्रावणातल्या ग्रंथांच्या समाप्ती झाली की गणपती बाप्पाचे आगमन व्हायचे. दहा दिवसाच्या उत्सवा नंतर पुढच्या वर्षी लवकर या असं सांगून गणरायाला भरल्या डोळ्यांनी निरोप दिला जायचा. तन मन अगदी रितं रितं व्हायचं.आणि बघता बघता पितृ पंधरवडा सुरू होऊन उंबऱ्या वर ठेवलेल्या तांदळाचं रहस्य उलगडत स्तोवर पितृ पंधरवडा सरत आलेला असायचा. आणि मग वेध लागायचे नवरात्राचे. नवरात्रीत कधी मागे तर कधी पुढे म्हणजे कधी कधी अधिक महिना आला तर कधीतरी मागे कधीतरी पुढे भोंडल्याचा उत्सव सुरू व्हायचा.**

शाळेतली धामधुम थोडी विसावलेली असायची. परीक्षा नाही थोडा अवलंब असायचा. आकाशातल्या ढगांना परतीच्या प्रवासाचे वेध लागलेले असायचे. कधी मधी हुक्की आली की आरजत गरजत यायचे.आणि एखाद्या माहेवाशीनीचा सासरी जाताना माहेरातून जसा पाय निघत नाही. तसे या परतीच्या पावसाचे व्हायचे. आणि मग जाता जाता चुणूक दाखवून जायचा.

कधी जर भोंडल्यात आणि नवरात्री त पाऊस पडला की वयस्कर माणसे म्हणायची 'माळेत हत्ती अडकला.' आम्हाला कसले कळायला .मनाच्या मग वेगवेगळ्या समजुती.भ्रामक कल्पना असा अडकला असेल ,तसा अडकला असेल. पण त्याचा अर्थ असा होता की नवरात्री आणि भोंडल्या त पाऊस पडला की म्हणायचे माळेत हत्ती अडकला. तेव्हा अशी समजूत की पहिल्या दिवशी पाऊस आला की तो नऊ दिवस येणार त्याला संबोधून ते म्हतले जायचे.

अर्थात सूर्याने हस्त नक्षत्रात प्रवेश केल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून भोंडल्याच्या उत्स्वाला सुरुवात व्हायची. आम्हाला कसले कळायला हस्त नक्षत्र निघाले किंवा काय ? ते आत्ता लक्षात येते. तर असा तो भोंडला ..जणू चोर पावलांनी येणाऱ्या थंडीच्या स्वागताला आला आहे.अशी मनाची समजूत...तर असा तो भोंडला ....त्या परकर झं परातल्या आक्की ,ताईडी, बाय,आणि त्यांच्या मैत्रिणी एका मैत्रिणीच्या घरी जमा व्हायच्या. आणि आम्ही त्यांच्या मागे मागे,साडे पाच सहा वाजता शाळेतून आल्यावर मग एका मैत्रिणीच्या घरी दर वर्षीचा ठरलेला कार्यक्रम असायचा.

मोठ्या बहिणीची वनिता नावाची एक मैत्रीण होती, तिच्या घरी माझी मोठी बहीण तिच्या मैत्रिणी जमा व्हायच्या,आणि मग आम्हीही मागे लागून त्यांच्या मागे जायचो. आणि भोंडल्याची तयारी व्हायची. त्या मैत्रिणीच्या भिंतीला एक मोठी दिवळी (खिडकी बारी झरोका) दोन फूट लांब नि दोन फूट रुंद अशी दिवळी होती.त्या दिवळीत या पोरी पोरीनी मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली एका पाटीवर खडूने हत्तीचे चित्र काढलेले, आणि ती पाटी त्या दिवळीत आडवी ठेवलेली असायची.त्याच्या पुढे नंदादीप लावलेला असायचा.त्या बारीच्या दोन बाजूला दोन खिळे असायचे.त्या खिळ्याला कधी मखमलीच्या फुलांचा तर कधी झेंडूच्या तर कधीतरी कारळ्याच्या फुलांचा हार बनवून पूजा व्हायची.

सगळ्या मैत्रीनीनी मिळून खिरापत आणायची ,हे अगोदरचं ठरलेलं असायचं .आणि काय खिरापत आणली.ते कोणी कोणाला सांगायचे नाही.अगोदर अंगणात जावून पाटावर खडूने हत्तीचे चित्र काढून हळदी कुंकू फुले वाहून पूजा करायची आणलेल्या खिरापतीचे डबे पाटाच्या भोवताली मांडायचे.

आणि भोंडल्याच्या भोवती फेर धरुन विविध प्रश्न उत्तरार्थक खेळ खेळले जायचे. एकमेकीना टाळ्या देत झिम्मा खेळत , दोन उंच मुलीनी एकीचा उजवा आणि एकीचा डावा हात एकात एक घालून उंच कमान बनवायची. त्या खालून बाकी मुलीनी वाकून जात जात काही पारंपारीक गाणी....

ऐलम्मा पैलम्मा गणेश देवा
खेळ मांडू दे करीन तुझी सेवा.

गाण्यान सुरुवात व्हायची.आणि नंतर..

एक लिंबू झेलू का दोन लिंब झेलू ,
दोन लिंब झेलू का तीन लिंब झेलू,
तीन लिंब झेलू का चार लिंब झेलू.
चार लिंब झेलू का पाच लिंब झेलू.
पाची पानां चा पाणोठा
माळ घाली हणमंता,
हणमंताची निळी घोडी,
येता जाता कमळे तोडी.
कमळाच्या पाठीमागे लपली राणी,
अगं अगं राणी इथे कुठे पाणी.
पाणी नव्हे यमुना जमुना
यमुनेची बारीक वाळू
तिथे खेळतो चिल्लारी बाळू.

म्हणता म्हणता चार पाच वेढे काढून पुन्हा सगळ्या मुलींनी फेर धरुन एका मुलीला प्रश्न विचारायचा. आत्ता नीटसं आठवत नाही . पण तिने उत्तर नाही दिले कि तिने दुसर गाणं म्हणायचे.

धावा हो धावा कृष्ण
वाजवतो मंजुळ पावा.
घासत होते मी गडू ,
कान्हा मागत होता हो लाडू.
धावा हो धावा कृष्ण
वाजवतो बघा मंजुळ पावा.
घालत होते मी वेणी
कान्हा मागत होता हो फणी.
धावा हो धावा, कृष्ण वाजवतो बघा मंजुळ पावा.
चुल्ह्यावर ठेवला होता मी तवा,कृष्ण वाजवतो बघा मंजुळ पावा.



गान म्हणता म्हणता नव्या डावाला सुरुवात व्हायची.

खर सांगायचे म्हणजे मला आजही आठवते. खिरपतीची एक गंमतचअसायची.

आजच्या सारखी थोडीच तेव्हा गोळ्या बिस्किस्टस होती.म्हणजे असायला होतीच की, पण तरीही खिरापतीच्या कुणाच्या डब्यात कधी चवळी चे दाणे,तर कधी कधी कुणाच्या डब्यात कोवळ्या कोवळ्या भुईमुगाच्या गणगटाचे कोवळे कोवळे शेंगदाणे,कुणाच्या डब्यात कधी फुटाणे,कधी भाजके शेंगदाणे कधी मक्याच्या कोवळ्या कोवळ्या कणसाचे दाणे.तिखट गोड असे. आत्ताचे pop corn थोडक्यात. म्हणजे निसर्गाला अनुरूप असेच....

आषाढ महिन्यात झालेल्या पेरणीने श्रावण महिन्यात पीक उचलून आलेले असायचे ,भाद्रपद महिन्यात त्याला फुले लागायची.( अर्थातच भुईमुग, मूग, चवळी इत्यादी ) आश्विन महिन्यापर्यंत त्याला कोवळ्या कोवळ्या शेंगा लागायच्या, भुईमुगा ला आरा टोचलेल्या असायच्या.त्याला छोट्या छोट्या शेंगा लागलेल्या असायच्या. ते कोवळे शेंगदाणे खाताना त्यातून निघणाऱ्या पाणी शोषणाची एक विशिष्ठ पद्धत म्हणजे आणि तो विशिष्ट आवाज आणि तो आनंद म्हणजे त्यावेळेला या छोट्या गोष्टीतून कितीतरी आनंद मिळायचा. थोडक्यात काय माणूस समाधानी आनंदी असायचा.

भोंडल्याच्या बऱ्याचश्या गाण्यावरुन तरी असे वाटते कि म्हणजे तेव्हा अगदी घरोघरी दूरदर्शन किंवा अन्य कुठल्याही मनोरंजनाच्या वस्तू नव्हत्या ,त्यामुळे असेल कदाचित . पूर्वी चूलं आणि मूलं एवढच स्त्रियांच विश्व होत . त्यामुळे असेल कदाचित अशा पारंपारीक खेळ उत्सव यांची परंपरा पडली असावी.म्हणजे जे मोठ्या लोकांकडून ऐकत आले यावरुन बोलतेय. म्हणजे बारकाईने पाहिले तर या गाण्यातून म्हणजे अशी बरीचशी गाणी आहेत.त्या गाण्यातून तरी एवढेच जाणवतेय कि ती गाणी नवविवाहित नववधू नणंद सासू सासरा नवरा सासर माहेर याच्या आधारावर आधरलेली दिसतात. अशा सण समारंभात एकत्र येवून सुना लेकी बाळी व्यक्त होउन रिकाम्या होत असतील.असे मला तरी वाटते.असो...


शेवटी खिरापत ओळखताना मात्र खूप गंमत यायची. ओळखू नये म्हणून खिरापत आणताना हि कला कौशल्याचा निकष लागायचा.म्हणजे काहीतरी नविन निर्मितीचा आनंद मिळायचा. पौष्टिक खाल्ले जायचे.एकीमेकींनी आपापले डबे घ्यायचे ते पाठीमागे लपवायचे. मग एकीच्या डबा ओळखायला सुरुवात करायची ओळीओळीने ओळखेपर्यंत पहिलीला दुसरीला तिसरीला असे विचारत रहायचे कधीतरी विशिष्ठ पदार्थ असला तर शेवटपर्यंत ओळखायचेच नाही. आणि कधीतरी अगदी पहिल्या डावातच ओळखायचे. पण त्यात एक वेगळाच आनंद भेटायचा. आनंदाच्या भरात मग आणखी एक गाणं व्हायचं.

बाजारात न आणला एकच आंबा,
त्याचे केले सुंदर लोणचे,
ते मी लोणचे बाबाला दिले.
बाबांनी मला शाबासकी दिली,
ती मी शाबासकी तांब्यात ठेवली.
तांब्याने मला पाणी दिले,
ते मी पाणी देवाला घातले.
देवाने मला भात दिला,
तो मी भात सर्वांना वाटला,
उरलेला मीच संपवून टाकला.

अशा प्रकारे मग मिळून मिसळून , सगळ्यांच्या डब्यात ले पदार्थ नैवेद्य दाखवून प्रत्येकाने प्रत्येकाला वाटायचा,आणि वाटतं असतानाही कितीही मतभेद असले तरी एकमेकांना खिरापत वाटताना चेहऱ्यावरचा तो निरागस भाव त्यात कुठेही राग द्वेष मत्सर कधीही दिसत नसायचा. मैत्रीचे, ऐक्याचे, प्रेमाचे, याच्यापेक्षा वेगळे उदाहरण आणखी काय असू शकते. यातून सामाजिक, सांस्कृतिक, पारंपरिक सलोखा जपला जात होता. असे करता करता सोळा दिवस कधी उलटून जायचे ते लक्षात ही यायचे नाही.

शेवटच्या दिवशी सर्वांनी मिळून तांदूळ डाळ लागणारे सर्व पदार्थ सगळ्यांनी आणायचे. शनिवार रविवार किंवा सुट्टीचा दिवशी त्याच मैत्रिणीच्या घरी मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली 'फोडणीचा भात' वगेरे बनवून सोळा दिवसांच्या त्या माला पूजेचे साहित्य आणि भाताचा नैवेद्य घेऊन नदीवर जायचे. तिथे हत्तीचे चित्र काढू न घरून घेतलेले सोळा दिवसांच्या मा ळा सर्व मांडून सगळ्यांनी मिळून पूजा करून नैवेद्य दाखवून सर्व नदीला सोडून द्यायचे. प्रसाद म्हणून भाताचा घास घास खायचा .मग घरी येवुन जेवण करून मग घरी यायचे. आज असे वाटते, या दूरदर्शन मोबाईल यांच्या व्यतिरिक्त ही आयुष्य खूप छान होते, आणि अजूनही आहे. या साऱ्या धाक धुकीच्या जीवनातून बाहेर येवून जीवनाचा आनंद घ्यायला हवा...

# चंद्रपुरातील महाकाली



आधुनिक केसरी

**महाकाली मंदिर चंद्रपुरातील गोंडकालीन इतिहासाची साक्ष देते . या मंदिराला वाकाटक काळाचेही संदर्भ सांगितले जातात. हे गुफा मंदिर आहे. रंगीत चित्रकला हे या मंदिराचे सर्वांत मोठे आणि अनोखे वैशिष्ट्य. अजिंठा-वेरूळ लेण्यांतील रंगीत चित्रांच्या परंपरेतील अशी चित्रकारी विदर्भात दुसरीकडे नाही. विदर्भातील अष्ट शक्तिपीठांपैकी एक म्हणजे चंद्रपूरचे महाकाली मंदिर . या महाकाली देवीचे संदर्भ स्कंद पुराणातही आढळतात . मध्य भारतातील एक महत्त्वाचे तीर्थस्थळ म्हणून या महाकाली मंदिराचा उल्लेख होतो.**

वर्षभर येथे भाविकांचा राबता असतो . चैत्रात मोठी यात्रा भरते. विदर्भ , मराठवाड्यासह आंध्र प्रदेशातील भाविकांची या यात्रेला अलोट गर्दी उसळते . महाकालीची ही यात्रा ' नांदेडची यात्रा ' म्हणूनही ओळखली जाते . चंद्रपूरची महाकाली आणि माहूरची रेणुका माता ही दोन तीर्थस्थळे विदर्भ आणि मराठवाड्याला परंपरेने जोडतात . महाकाली मंदिर चंद्रपुरातील गोंडकालीन इतिहासाची साक्ष देते . या मंदिराला वाकाटक काळाचेही संदर्भ सांगितले जातात . हे गुफा मंदिर आहे . रंगीत चित्रकला हे या मंदिराचे सर्वांत मोठे आणि अनोखे वैशिष्ट्य . अजिंठा - वेरूळ लेण्यांतील रंगीत चित्रांच्या परंपरेतील अशी चित्रकारी विदर्भात दुसरीकडे नाही .

येथील मूळ मंदिराची निर्मिती कशी झाली , याविषयी अनेक दंतकथा आहेत . एका कथेनुसार , गोंडराजा खांडक्या बल्लाळशाह ( १४७२ ते १४९७ ) हा शिकारीच्या निमित्ताने या परिसरातील जंगलात फिरत होता . फिरता फिरता तो देवीच्या या मूळ गुफेकडे आला . तेथील पाण्याने त्याने व्रण साफ केले . त्याचे व्रण नाहीसे झाले . पुढे त्याला स्वत ः महाकालीने दृष्टांत दिला . स्वत ः चे स्थान सांगितले . दुसऱ्याच दिवशी राजाने जंगलातील भुयारी मार्ग मोकळा केला . गुफा मोकळी केली . त्यात देवीची कोरीव मूर्ती सापडली . राजाने तेथे पहिले छोटेखानी मंदिर बांधले . आजच्या मंदिराची निर्मिती ही राणी हिराईने १७व्या शतकात केली . १७०७ ते १७०९ हा या मंदिराच्या उभारणीचा काळ . देवगडचा राजा दुर्गशाह व गोंडराजा वीरशाह ( बिरसिंग ) यांच्यात लढाई झाली . वीरशाहाचा पाडाव होऊ लागला होता . अचानक ' जय महाकाली ' चा जयघोष झाला . वीरशाहाच्या सैन्यात चैतन्य संचारले आणि राजा वीरशाहचा विजय झाला . महाकालीच्या कृपेनेच लढाईत विजय झाल्याचा राणी हिराईचा दृढ समज झाला . या कृतज्ञतेतून तिने मंदिराचा कायापालट केल्याचे सांगितले जाते . ही राणी हिराई ( सन १७०४ - १७१९ ) कर्तृत्ववान होती . मदनापूर होशंगाबाद येथील मोगल सरदार ढिल्लनसिंग मडावी यांची ती मुलगी . कुशाग्र बुद्धीची हिराई शस्त्रविद्येत पारंगत होती . गोंडराजा किसनशाह याने हिराईतील गुण ओळखले होते . त्यामुळेच त्याने तिला आपला मुलगा वीरशाह याच्यासाठी मागणी घातली . १७०४च्या सप्टेंबरमध्ये राजा वीरशाहची हत्या झाली . वयाच्या २२ - २३व्या वर्षी हिराईला वैधव्य झाले . जबाबदारी आली . गादीला वारस नव्हता . राणीने तीन वर्षांच्या रामशाहला दत्तक घेऊन नेटाने राज्यकारभार सुरू केला . आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत , याची तिला जाणीव होती . तिच्या काळात पाच मोठी युद्धे झाली . या युद्धांमध्ये राणीचे युद्धकौशल्य दिसले . मुत्सद्देगिरीही जाणवली . तिचा पराभव झाला . अर्धे राज्य गेले . पण ती खचली नाही . ती जितकी युद्धनिपूण , तितकीच धार्मिक वृत्तीचीही होती . महाकाली मंदिरासोबतच अंचलेश्वर , एकवीरा , खटीचा गणपती मंदिर , मुरसा येथील शिवमंदिर , गिलबिली येथील महादेव मंदिर , वैरागड येथील भवानी मंदिर तिनं बांधली . मार्कंडादेव येथील मार्कंडेश्वर मंदिर दुरुस्त केले . वीर पतीची आठवण कायम राहावी , म्हणून राजा वीरशाह याची मोठी समाधी हिराईने बांधली . आज मात्र ही समाधी दुरवस्थेत आहे .

महाकाली मंदिराच्या संरक्षणाची जबाबदारी भारतीय पुरातत्त्व विभागाकडे आहे . रामायण , महाभारतातील प्रसंग हे या मंदिराच्या शिल्पकलेतील आणखी एक वैशिष्ट्य . हे सारे शिल्प म्हणजे गोंडकालीन हस्तकलेचा उत्तम नमुना आहेत . महाकाली मंदिराला चार दरवाजे आहेत . आतील भागात कमानी आहेत . बाहेरील शिल्पांमध्ये राणीचे स्नान , राजा - राणी , मल्लयुद्ध आदी प्रसंग आहेत . एका शिल्पात मदारी पुंगी वाजवित असून समोर नाग फणा काढून आहे . एका खिडकीच्या बाजूला कोरलेल्या प्रसंगात यशोदेसमोर गवळणी एकत्र आल्या आहेत आणि त्या श्रीकृष्णाच्या तक्रारी करीत असल्याचे दिसते . आतील बाजूस गाईवरून झेप घेऊन शिकार करणारा वाघ , दोन सैन्यांतील युद्धप्रसंग , नमस्कार करीत असलेले भक्तगण , घोडेस्वार , गजस्वार , उंटस्वार आहेत . या मंदिरासंदर्भात पुरातत्त्वाचे अभ्यासक डॉ . रघुनाथ बोरकर सांगतात , ' चवथ्या - पाचव्या शतकात हे गुफा मंदिर होते . ते वाकाटक काळातील असावे . चंद्रपूर जिल्ह्यात अशा अनेक गुफा आढळतात . या मंदिराची स्थापत्यरचना ही गोंड - भोसलाशैलीची आहे . राज्य सार्वभौम आणि संपन्न असले की स्थापत्यरचना तयार होतात . त्यात त्या - त्या शासकाचे प्रतिबिंब उमटते . चंद्रपूरमध्ये गोंडांचा शासनकाळ साधारणत ः ५५० वर्षे होता . पण बहुतांश काळ ते मोगलांचे मांडलिक होते . आताच्या महाकाली मंदिरात राणी हिराईच्या कल्पकतेचा प्रभाव दिसतो .

या आदिशक्ती महाकालीच्या यात्रापरंपरेविषयीही आख्यायिका आहेत . एका प्रचलित आख्यायिकेनुसार , नांदेड जिल्ह्यातील तळेगाव उमरी येथील राजाबाई देवकरीण ही धार्मिक वृत्तीची स्त्री . ती आदिशक्तीची उपासक होती . १९०५ - ०६च्या दरम्यान चंद्रपूरची आदिशक्ती देवी महाकाली ही राजाबाई देवकरीणीच्या स्वप्नात आली . ' मी चंद्रपूर परगण्यात आहे . तेव्हा तू माझ्या भक्तीचा प्रसार कर ', अशी आज्ञा तिला दिली . देवीची आज्ञा स्वीकारून राजाबाई आपल्या भागातील लोकांचा एक जत्था घेऊन चंद्रपूरला महाकाली देवीच्या दर्शनास आली . दर्शन घेऊन गावी परतली . तेव्हापासूनच या देवीच्या यात्रेला नांदेडसह मराठवाड्यातील भाविक मोठ्या संख्येने येऊ लागल्याचे सांगितले जाते .

चैत्र शुक्ल षष्ठी ते पौर्णिमेपर्यंत ही यात्रा चालते . यात्रेच्या नऊ दिवसांत देवी व्रतस्थ असते . वरण , भात , पोळी असा नेवैद्य देवीला दिला जातो . दहीदुधाचा अभिषेक केला जातो . पुरणाच्या आरतीनंतर घट हलविला जातो . त्यानंतर भक्त नारळ फोडतात . पोतराज हे या यात्रेत आकर्षणाचे केंद्रबिंदू असतात . आली आली या महाकाली। तिचा कळेना अनुभऊ। साऱ्या जगाला घालते खाऊ। माय माझी काली।। अशी लोकगीते म्हणत भक्त महाकाली देवीचा महिमा गातात . देवीचे भक्त देवकर व देवकरीण आंबिल घेतल्याशिवाय जात नाहीत . या मंदिराचे पुजारीपण दिवंगत नामदेवराव गोविंदराव महाकाले यांच्याकडे आले . गेल्या १३ पिढ्यांपासून त्यांच्या वंशजांकडे ही परंपरा सुरू आहे . गोंडकालीन इतिहास आणि अध्यात्माची परंपरा असा दुहेरी संदर्भ असलेले हे महाकाली मंदिर विदर्भाचीच नव्हे तर मध्य प्रांताची एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे .

# वेळ पडल्यास आम्ही कुठलेही रूप धारण करू शकतो : सुवर्णा उमाप



संजय व्यापारी
संपर्क क्र. 7743918559

आधुनिक केसरी

**काही महिलांचे अनमोल कार्य असते व अशा अनमोल कार्यापासून नवीन पिढीतील असंख्य महिला प्रोत्साहीत होत असतात व त्यांच्या या प्रेरणास्थान होतात. अशाच एका प्रेरणा ताईची आम्ही मुलाखत आम्ही वाचकांसाठी देत आहोत, ज्यांनी आज पोलिस सेवेत उल्लेखनीय कार्य करून असंख्य महिलांचा आधार झाल्या आहेत. त्यांचे नाव आहे सुवर्णा श्रावण उमाप (डोंगरे), त्या सध्या सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून आर्थिक गुन्हे शाखा मुंबई येथे कार्यरत आहेत. आपल्या कार्यात उल्लेखनीय कार्य करून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे सन्मानचिन्ह मिळवून गौरविलेल्या महिला पोलिस निरिक्षक सुवर्णा उमाप ह्या पोलिस विभागातून आपल्या लक्षवेधी कामगिरीतून अल्पावधीतच नावारूपास आल्या आहेत.**



उमाप यांनी कला शाखेतून पदव्युत्तर पदवी मिळवली असून गेल्या 13 वर्षापासून त्या पोलिस सेवेत आहेत. आर्थिक गुन्हे शाखेमध्ये अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीच्या फसवणुकीच्या गुन्ह्याचा तपास केला जातो असे त्यांनी सांगितले.

तुम्ही हे क्षेत्र कसे काय निवडले असे विचारता त्यांनी सांगीतले की मोठा भाऊ अमोल उमाप पोलीस भरतीची तयारी करत होता त्याच्या प्रेरणेमुळे व मार्गदर्शनामुळे 2008 मध्ये पोलीस दलात भरती झाले. सुरुवातीपासूनच स्वप्न मोठे व वेगळे असल्यामुळे एमपीएससीची तयारी सुरूच होती याच दरम्यान विवाह झाला मग नोकरी कौटुंबिक जबाबदारी आणि स्पर्धा परीक्षा असा हा प्रवास पुन्हा सुरू झाला. माझे पती देखील स्पर्धा परीक्षेची तयारी करत असल्यामुळे या प्रवासामध्ये माझे पती महादेव डोंगरे यांनीच मार्गदर्शक व शिक्षकाची भूमिका केली. खरं तर त्यांनी स्वतःची स्वप्न व इतर गोष्टी बाजूला ठेवून मला आधार दिला व माझ्या पाठीशी उभे राहिले. तसेच कुटुंबीय माझे वडील श्रावण उमाप, आई छाया, मोठा भाऊ अमोल, बालाजी उमाप, सूरज उमाप व माझे सासरे आश्रुबा डोंगरे, सासुबाई यमुना डोंगरे, भाची निशा या मंडळी तसेच माझी मुलगी प्रांजल डोंगरे हिने देखील खूप आधार दिला. या सर्वांचा परिणाम म्हणून राज्यसेवा (पूर्व), सरळसेवा 2 निकाल आणि याच वर्षी 2012 पोलिस उपनिरीक्षक असे 4 निकाल आले व अंतिम निवड पोलीस उपनिरीक्षक म्हणून मला जॉईन करता आले.




**प्रश्न : तुमचे स्वप्न काय होते ?**

**उत्तर :** तर स्वप्न डॉक्टर बनायचं होत पण परिस्थीतीने पोलिस सेवेत आणले.

**प्रश्न : तुमचे आवडते छंद कोणते ? ते जोपासले जातात का ?**

**उत्तर :** मला वाचनाची आवड आहे, बाकी संपुर्ण दिवस जवाबदारीतच जातो आता हाच छंद झाला आहे.

**प्रश्न : इथपर्यंत येण्यासाठी महिला म्हणून काही अडथळे आले का ?**

**उत्तर :** नाही अशी काहीच अडचण नाही आली.

**प्रश्न : घरची परिस्थिती कशी होती ?**

**उत्तर :** घरची परिस्थिती जेमतेमच होती परंतु वडिलांनी तिन्ही भावंडांना शिकवले. आज तिघे स्वतःच्या पायावर उभे आहेत.

**प्रश्न : या क्षेत्रात येण्यासाठी घरची साथ होती का?**

**उत्तर :** नाही मला सासर आणि माहेर दोन्ही ठिकाणांवरून भक्कम साथ मिळाली.

**प्रश्न : कोणतंही क्षेत्र निवडताना स्वतःला ते आत्मसात करणे खुप गरजेचे आहे, हा गुण तुमच्यात आहे का ?**

**उत्तर :** होय नक्कीच मी इथे येण्या अगोदर मला हे क्षेत्र एकदम फिल्मी स्टाइल जसे चित्रपटात दाखवतात त्याप्रमाणे वाटले होते त्यामुळे मनात एक वेगळीच भावना होती पण त्यापेक्षा येथील काम खूप वेगळे आहे, प्रत्येक केसमध्ये वेगळा अनुभव असतो व प्रत्येक केसकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा असतो येथील काम खूप चॅलेन्जींग आहे त्यामुळे येथे गुणवत्तेची कसौटी लागते.

**प्रश्न : पहिल्यांदा वर्दी घातल्यावर कसे वाटले ?**

**उत्तर :** स्वतःचा आदर - वाटून आपण सक्षम असल्याची जाणीव झाली. तसेच माझे पती आणि कुटुंबीयांचे स्वप्न पूर्ण केल्याचा आनंद वाटला.

**प्रश्न : सहकाऱ्यांची वागणूक कशी मिळते?**

**उत्तर :** पोलीस अधिकारी म्हणून काम करत असताना सोबत काम करणारे वरिष्ठ अधिकारी, सहकारी अधिकारी तसेच सोबतचे कर्मचारी यांचे नेहमीच सहकार्य मिळत आहे तसेच त्यांच्याकडून आदरयुक्त वागणूक मिळते.

**प्रश्न : तुम्ही महिला आहात म्हणून काही अडचणी आल्या का ?**

**उत्तर :** एक महिला म्हणून काम करत असताना कधी अडचणी आल्या नाहीत तसेच वरिष्ठ अधिकारी यांनीदेखील कोणतीही जबाबदारी महिला अधिकारी म्हणून देण्याचे टाळले नाही उलट अत्यंत संवेदनशील प्रकरणाची जबाबदारी विश्वासाने सोपवली. त्यामुळे माझा आत्मविश्वास नेहमीच वाढतो आहे.

**प्रश्न : चांगल्या कामाचे बक्षिस मिळाल्यावर कसे वाटले ?**

**उत्तर :** आपल्यावर सोपवलेली जबाबदारी निष्ठेने पार पडल्याची पावती मिळाल्याचा आनंद होतो तसेच कौतुकाची थाप पुढचे काम अधिक समर्पणाने आणि आत्मविश्वासाने करण्याची प्रेरणा मिळते.

**प्रश्न : ड्युटीमधे काही वाईट तर काही चांगल्या आठवणी लक्षात आहेत काय ?**

**उत्तर :** एखादे पीडित महिला किंवा इतर कोणी ज्या वेळेस पोलीस प्रशासनाकडे मोठ्या आशेने येतात आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ज्यावेळेस आम्ही त्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचे काम करतो त्यांच्या चेहऱ्यावरील हलकेसे स्मित खरं तर खूपच सुखावून जाते. काही प्रकरणांमध्ये महिलांना मदत करत असताना काही महिलांकडून अरेरावीची भाषा असेल किंवा एखाद्या वेळेस हलकसं विरोध असेल अशा वेळेस त्यांना त्यांच्या हक्क अधिकाराची जाणीव नसल्यास वाईट वाटते.

**प्रश्न : आजच्या काळात महिलांना पुरुषाबरोबर स्थान मिळाले त्याबद्दल काय वाटते ?**

**उत्तर :** स्त्री आणि पुरुष हा नैसर्गिक भेद आहे. मात्र मानवतेच्या दृष्टीने ते दोघेही समानच आहेत. मग ते क्षेत्र कोणतेही असू दे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये महिला व पुरुष यांना समान अधिकार देऊन खरंतर मानवतेची उंची वाढविण्याचे काम केले आहे. आज महिला सर्व क्षेत्रात कार्यरत पाहून मनस्वी आनंद वाटतो आणि अभिमान आहे.

**प्रश्न : नोकरी आणि घर दोन्ही कसे मॅनेज करता ?**

**उत्तर :** दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळत असताना थोडी तारेवरची कसरत होते पण कौटुंबिक आधार भक्कम असल्याने दोन्ही ठिकाणी मी माझ्या दोन्ही जबाबदाऱ्या व्यवस्थीत पार पाडते.

**प्रश्न : आई, बहीण, मूलगी, सासू, नणंद, मैत्रीण, बॉस असे विविध रूपं तुम्ही कसे साकारता ?**

**उत्तर :** खरंतर प्रत्येक भूमिका ही प्रत्येक भूमिकेपासून वेगळी आहे आणि प्रत्येक भूमिका मी अतिशय उत्साहाने प्रेरणेने निभावत असते. या सर्वच भूमिका निभावत असताना खरंतर कौटुंबिक पाठबळ अतिशय महत्त्वाचे आहे आणि ते माझी मुले प्रांजल आणि प्रज्वल, पती, नणंद सासू-सासरे व खास माझे आईवडील, भाऊ यांचे सर्वांकडूनच नेहमीच पाठबळ मिळत असते म्हणूनच मी सर्वच भूमिका जाणते आणि प्रभावी जगते सुद्धा.

**प्रश्न : तुमच्या फिटनेससाठी तुम्ही काय करता ?**

**उत्तर :** दररोज वॉकिंग आणि थोडेफार योगा, प्राणायाम करत असते व मानसिक आरोग्यासाठी नियमित वाचन करत असते.


धन्यवाद मॅडम तुम्ही व तुमची संपुर्ण टीम खुपच प्रशंसनीय काम करीत आहे, तुमच्या पुढिल कार्यास खूप खूप शुभेच्छा!





# हर्सूलची... हरसिध्दी देवी

आधुनिक केसरी




सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

शहरी वातावरणापासून काहींच दूर राहिलेलं छोटसं गाव हर्सूल औरंगाबाद मध्ये असूनही थोडसं अलिप्त असणार आपला ग्रामीण जीवन टिकवून ठेवलेले हे हर्सूल गाव.आज हजारो भक्तांच्या श्रद्धेमुळे मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रातही हरसिद्धी देवीच्या मंदिरामुळे हे परिचित असलेले छोटेसे गाव.

हरसिद्धी देवता तशी मुळची उज्जैनची. राजा विक्रमादित्य याची कुलदेवता. विक्रमादित्य राजालाही हरसिद्धी देवता प्रसन्न झाली व त्याला रिद्धी सिद्धी व अपार वैभव प्राप्त झाल्याचा उल्लेख आपणास इतिहासात आढळतो. याच हरसिद्धी देवीचं हे दुसरं रूप हर्सूलला आहे. उज्जैनला ज्या काळात विक्रमादित्य राजाने हरसिद्धी देवीची स्थापना केली. साधारणता त्याच कालखंडात हर्सूललाही हरसिद्धी देवीची स्थापना झाल्याचा उल्लेख आपणास पुराणांच्या इतिहासाच्या पानात आढळतो.

हरसिद्धी देवीचा हे मंदिर पूर्वाभिमुख असून संपूर्णतया दगडी बांधकामात केलेला आहे. मंदिराच्या गाभाऱ्यापासून कळसापर्यंतची उंची साधारणता तीस फूट आहे. समोर छोटासा दहा फूट उंचीचा सभामंडप आहे. मंदिरासमोर रामाचे छोटे मंदिर असून दोन्ही मंदिराच्या मधील विस्तीर्ण भागात रामकुंड आहे. मंदिराच्या समोर पाच फूट उंचीचा अतिशय देखणा अखीव रेखीव असा प्रचंड मोठा नंदी आहे.



संपूर्ण भारतात दोनच नंदी मोठे आहेत. एक रामेश्वर येथील तर दुसरा हरसिद्धी देवीच्या समोरील... असा उल्लेख इतिहासात आपणास आढळतो.

हरसिद्धी मंदिरातील ही देवीची मूर्ती संपूर्णतया काळ्या पाषणाची आहे. साधारणपणे तीन फूट उंचीची ही मूर्ती आहे. हरसिध्दी देवी चतुर्भुज आहे. तिच्या हातां मधे शंख , चक्र , शस्त्र , तलवार , तिने धारण केलेली आयुधे आहेत. देवीच्या समोरच महादेवाची मोठी पिंड आहे. मंदिराच्या मागील बाजूस देवीचा मुखवटा ठेवलेला आहे. कार्तिक पौर्णिमेस हा देवीचा मुखवटा पालखीत घालून तो चौराह या ठिकाणी असलेल्या देवीच्या मंदिरात घेऊन जाण्याची जुनी परंपरा आजही कायम आहे. मंदिराच्या समोर चंद्रकुंड आहे. त्याच्या समोर मोठी दीपमाळ उभी आहे . मंदिराच्या उजव्या बाजूस दत्तात्रयाचे छोटे मंदिर आहे. त्याच्या बाजूला गणपतीचं मंदिर आहे. त्याच्यापुढे पाताळेश्वराचे मंदिर आहे. पाताळेश्वरच्या मंदिरात पाण्यात असलेली शंकराची पिंड आपणास दिसून येते. मंदिराच्या उजव्या बाजूस सूर्यकुंड असून त्याच्यासमोर रेणुका मातेचे छोटेसे मंदिर आहे.

हरसिद्धी देवी खूप प्राचीन देवता पैकी एक देवता आहे.हरसिध्दी देवीला मंदिराला इतकी प्राचीन काळापासून परंपरा प्रसिद्धी लाभलेली असली तरी संपूर्ण मदिराचा परिसर...समोरील कुंडात साजलेलं पाणी त्यामधे पाडलेली फुंले.. नारळाच्या वरील केसर... आजुबाजूला असलेली मोठी अस्वच्छता भक्तगणांचे मनं खिन्न करणारी आहे. इतकी प्राचीन काळापासून परंपरा असलेलं हे हरसिध्दी देवीचे हे मंदिर शासनाच्या दरबारी दुर्लक्षित राहिलेले आहे हे बाकी खरं...या मंदिराचा विकास व्हावा.. अमुलाग्र कायापालट व्हावा ही साऱ्याच भक्तगणांनी इच्छा आहे... औरंगाबाद मधिल प्राचीन खडकेश्वर मंदिराचा आदरणीय जुगलकिशोर तापडिया यांनी संपूर्ण कायापालट केला आहे.आता याही मंदिराचा जीर्णोद्धार अशाच मोठ्या दानशूर व्यक्तींच्या मदतीनी अथवा शासनाच्या मदतीनी असं नवं रुप मंदिराला मिळावं हिच देवीच्या चरणी अगदी मनापासून प्रार्थना....

हरसिद्धी मंदिराच्या ट्रस्टची स्थापना साधारणपणे तीन दशकापूर्वी झालेली आहे. मंदिरात नित्य नियमाने पूजा.. अर्चा.. नैवेद्य ..आरती ..असे उपचार हे वैदिक पद्धती पद्धतीने रोज पुरोहितकडून होत असतात.नवरात्र उत्सव , रामनवमी , हनुमान जयंती , कोजागिरी पौर्णिमा , कार्तिक पौर्णिमा , दसरा , दिवाळी , अशावेळी मंदिरात खूप मोठ्या प्रमाणावर उत्सव करण्याची परंपरा आजही कायम आहे. श्रावण मास , अधिक मास , यावेळी देखील मंदिरात खूप मोठ्या प्रमाणावर भक्तगण येत असतात. कार्तिक शुद्ध पौर्णिमेस या मंदिराच्या परिसरात मोठी यात्राही भरण्याची परंपरा आजही कायम आहे.

हर्सूल परिसरातील अगणित भक्तांची शिर्डीच्या साईबाबांवर आणि श्रीकृष्णावर अपार श्रद्धा असल्यामुळे हरसिद्धी मंदिर ट्रस्टने विचार हाच आहे की भविष्यात शिर्डीच्या साईबाबांचे व श्रीकृष्णाचे अशी दोन मंदिरे या ठिकाणी हरसिद्धी मंदिराच्या परिसरात बांधली जावीत. त्या साठी दानशूर व्यक्तींच्या आर्थिक मदतीची गरज मात्र आहे. अशी आर्थिक मदत दानशूर व्यक्तीने दिली तर लवकरच हरसिद्धी मंदिरामध्ये श्रीकृष्णाचे आणि साईबाबा चे मंदिर खूप छान पणे उभे केले जाईल असा विश्वास हरसिद्धी ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांना वाटतो . देवीच्या कृपेने अशी मंदिरे व्हावी ही साऱ्या भक्तांची इच्छा आहे हे बाकी खरं...

आधुनिक केसरी



# नवशक्तीचे नऊ रंग

## सहावा दिवस : रंग राखाडी



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

प्रिय वाचकांनो, प्रणाम! मागील पाच दिवसांत नवरात्रोत्सव संदर्भात सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक आणि वैचारिक विचार चिंतन-मंथन होत असतांना अनेक विचारांचा उहापोह केला. चौथ्या-पाचव्या लेखांत पिवळा-हिरवा या रंगांविषयी थोडक्यात चिंतन झाले. पिवळा रंग म्हणजेच आई-पत्नी-बहिण इत्यादी स्त्रीशक्ती घराघरांत ज्ञान-प्रकाश-संपन्नता रूपाने सदैव आपले प्रेमसिंचन करताहेत आणि हिरवा रंग म्हणजेच आई! पृथ्वी माता! त्याचे अस्तित्व अन्नाच्या कणाकणात आढळते. हिरवा रंग निर्मितीचे प्रतिक असून हिरवा शालू, हिरवा चुडा आदि प्रतीकं ही सौभाग्याची आहेत.

हिरव्या-पिवळ्या रंगानी
नववधू ही सृष्टी सजली
संगोपन उदरात धरतीचे
आनंद-शक्ती मनी रुजली

अशाप्रकारे हे पाच दिवस श्री देवी विविध रूपांनी आपल्यामध्ये अवतरली, तीचा आशीर्वाद आणि विविध मंत्रांच्या आधारे आपल्या शरीरातील उर्जा प्रज्वलित करण्याचे कार्य सुरु आहे. अनंत रंगांची उधळण होत असतांना संपूर्ण आसमंत श्री देवी मातेच्या जयघोषाने दुमदुमून जातो आहे. हा जयघोष आपल्या आईचा, प्रचंड सहनशक्ती धारण केलेल्या स्त्री शक्तीचा असून याद्वारे तिचे विश्व-मातृत्व अधोरेखित होते आहे!

'घट आणि घट स्थापना म्हणजे काय?' घट म्हणजे भांडे किंवा घट म्हणजे 'जैसी भांडघटशरावीं । तदाकारें असे पृथ्वी !' तसेच घट म्हणजे 'म्हणौनि प्राणिजाताच्या घटीं । करूनि कंदावरी आगिठीं' मानवी शरीर! घट स्थापना हा आंतरिक विषय आहे. तो केवळ वरवरचा सोहळा नसून तो मानवी शरीर आणि आंतरिक शक्तीच्या संदर्भातील विषय आहे. श्री देवी मातेची अनंत रूपे, विविध अवताराच्या कथा किंवा मिथकं आहेत. श्री देवी मातेलाच आपण शक्ती संबोधतो. ही शक्ती समग्र स्त्री-पुरुषांमध्ये संस्थापित असून तीचा अधिवास संपूर्ण चराचरात आहे. ती म्हणजे केवळ कुणी स्त्री किंवा स्त्री-लिंग नसून संपूर्ण विश्वात तीचा संचार आहे, अशी ती शक्ती! ती म्हणजेच आंतरिक शक्ती! या नऊ दिवसांत लोक 'घटी बसतात' म्हणजे एकांतात राहतात. बाह्यशुद्धी बरोबरच अंतःकरण शुद्धी अत्यंत महत्वाची आहे! दुर्दैवाने लोक सोवळे-ओवळे, स्पृश्य-अस्पृशता याचे पालन करतात, त्याहीपेक्षा माणसाने या नऊ दिवसांत 'घटी बसून' म्हणजेच आपला शरीररुपी घट स्थिर ठेवून अंतःशक्तीची आराधना करणे अपेक्षित आहे! या नऊ दिवसात आपल्या शरीरातील उर्जेचा मूलस्त्रोत असलेले 'मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा, सहस्त्र' या सात चक्रावर आपले लक्ष केंद्रित करून, हा शरीररुपी घटातील आंतरिक शक्ती जागृत करून मन आणि शरीर अंतर्बाह्य निर्मळ करावे! आपापल्या आंतरिक शक्तीची मनोभावे आराधना करावी! शुद्ध-शक्तिशाली बनावे!

आज सहाव्या दिवशी श्री देवी कात्यायनी रुपात प्रकट झाली आहे. कात्यायन ऋषीच्या अराधनेमुळे मातेने अवतार घेऊन महिषासुराचा वध केला, म्हणून कात्यायनी, दुर्गा, पार्वती आदी नावांनी आज तिचे पूजन केले जाते. आज कात्यायनी मातेने राखाडी रंगांची वस्त्रे परिधान केली आहेत. हा रंग म्हणजे काळा आणि पांढरा या दोन मूळ रंगांचे मिश्रण आहे. हा रंग अनेक अर्थाने महत्वपूर्ण असून दिवस-रात्रीचे प्रतिक आहे. राखाडी रंग म्हणजे तटस्थ! मोजके बोलणे, मोजकेच स्मित अगदी सर्वच गोष्टी एकदम शिस्तबद्ध आणि नियंत्रित असणाऱ्या लोकांचा राखाडी रंग आवडता असतो. शांत-संयम-आपले काम मन लावून करणे, कुणाचीही अनावश्यक स्तुती किंवा निंदा न करणे, म्हणजेच स्थितप्रज्ञ व्यक्तींना हा रंग प्रिय आहे. तेंव्हा चला, आज सहाव्या दिवशी आपण आपले मन आज्ञा चक्रावर एकाग्र करून आराधना करून अनिष्ट शक्तींना कायमचा निरोप देऊन शरीर-मन अंतर्बाह्य शुद्ध करूया! ॐ कात्यायनी माता कि जय!

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# आपले सण, उत्सव आणि संस्कृती



प्रा. प्रवीण डिगांबर बोंद्रे
संपर्क क्र.: 7620021396

आधुनिक केसरी

**जगाच्या पाठीवर भारत हा देश सर्वात जास्त सण उत्सव साजरा करणारा देश आहे. भारतात महादेवाचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. गणेश उत्सव, दुर्गा उत्सव इत्यादी खुप मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. त्यानंतर पोळा, नागपंचमी, मकर संक्रांत ,दसरा, वेगवेगळ्या जयंत्या, पुण्यतिथ्या इत्यादी साजऱ्या केल्या जातात. पण या सर्वांपैकी सर्वात थाटामाटात भारतात दिवाळी साजरी केली जाते. दिवाळी हा सण केवळ पाच दिवसाचा जरी असला तरी त्याचा माहोल एक महिना आरामशीर चालतो.**

दिवाळी हा भारतातील हिंदू लोकांचा सर्वात मोठा सण आहे. हिंदू पंचांगानुसार दिवाळीचा सण कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या अमावस्येच्या दिवशी साजरा केला जातो. दिवाळी हा सण आनंद, समृद्धी आणि वैभवाचे प्रतीक आहे.

दिवाळी सणाला महालक्ष्मीची विशेष पूजा केली जाते. असे मानले जाते की दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीची पूजा केल्याने जीवनात कीर्ती आणि वैभव टिकून राहते आणि जीवनात पैशाची कमतरता दूर होते. मात्र दिवाळी हा सण पाच दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. दिवाळी म्हटली की दिवाळी ची सुरुवात ही धनत्रयोगदशीच्या दिवसापासून सुरू होते. त्यानंतर नरक चतुर्दशी, दिवाळी,बलिप्रतिपदा म्हणजे पाडवा आणि भाऊबीज हे पाच दिवस दिवाळी मुख्य रुपाने साजरी केली जाते. विदेशात राहणारे भारतीय लोकं सुद्धा दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करतात. ज्या ज्या देशात जे जे सण उत्सव हे साजरे होत असतात त्या त्या देशात त्या सण व उत्सवावर त्या संस्कृतीचा मोठा प्रभाव पडत असतो. भारतीय संस्कृती मध्ये दिवाळीला लोकं घरच्या स्वच्छतेला रंगरंगोटीला अधिक महत्त्व देतात. दिवाळी पंधरा दिवस पुढे राहिली असेल तर पंधरा दिवस आधीपासूनच घराला रंग देणे, घर स्वच्छ करणे इत्यादी कामांना भारतीय लोकं प्राधान्य देतात .भारतीय लोकं आपल्या घरी गोडधोड पदार्थ करतात. फराळाचं बनवतात. नवीन नवीन कपडे खरेदी करतात. फटाके, उजळण्या, मापलं, लक्ष्मीच्या मूर्ती, लाह्या बत्तासे, उठण्याच्या पुडया, सुवासिक तेल ,दागिने, तसेच किराणा खरेदी करतात. तसेच वेगवेगळ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, आकाशदिवे, इलेक्ट्रॉनिक दिवे, फटाके इत्यादी वस्तुने बाजार खचाखच भरलेला असतो. या सणासुदीच्या दिवसात भारतीय संस्कृतीचा लोकांवर जसा प्रभाव पडतो तसाच तो उद्योगधंद्यांवर पण अतिशय मोठ्या प्रमाणावर पडतो. गरिबातला गरीब व्यक्ती या दिवाळीच्या दिवसात थोडी का होईना पण आपल्या पद्धतीने खरेदी करतो. आणि दिवाळी साजरी करतो. भारतीय संस्कृतीमुळे उद्योगधंदे दिवाळीच्या मौसमात मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन करून वस्तूंचा पुरवठा बाजारात पाठवतात. भारतीय संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण अंधारातून उजेडाकडे नेणारा सण आहे. त्यामुळे सर्वात जास्त लोकं पण उजळण्या, मेणबत्त्या, इलेक्ट्रॉनिक दिवे, आकाशदिवे, मोठ्या प्रमाणात खरेदी करतात.


दिवाळीच्या दिवसात लोक लक्ष्मीपूजनाची तयारी करण्यासाठी बऱ्याच वस्तू बाजारातून खरेदी करतात. ग्राहकांची किराणा दुकानात इतर दुकानात कपड्यांच्या दुकानात एकच गर्दी झालेली असते. भारतीय संस्कृतीचा सर्वात जास्त प्रभाव हा कशावर पडत असेल तर तो पडतो व्यापारावर. दिवाळी आणि भाऊबीजेसाठी लोकं एका शहरातून दुसऱ्या शहरात, एका देशातून दुसऱ्या देशात मोठ्या प्रमाणात प्रवास करत राहतात.बसेस, ट्रॅव्हल एजन्सी, ट्रेन, एअरपोर्ट हे प्रवाशांनी खचाखच भरलेली असतात. भारतीय संस्कृतीत दिवाळीत महालक्ष्मीची पूजा केली जाते. भाऊबिजेला भाऊ बहिणीच्या घरी जातो. धनत्रयोदशीच्या दिवशी सोनं खरेदी करण्याला खूप महत्त्व दिले जाते. दिवाळीला झेंडूची फुले खूप जास्त प्रमाणात घर सजावटीसाठी व पूजेसाठी नेले जातात. दिवाली हा मुख्य सण आहे. त्याच खालोखाल दसरा, मकरसंक्रांत, पोळा, गणेशउत्सव, दुर्गाउत्सव हे मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येतात. आपल्या संस्कृतीत खूप सगळे धार्मिक उत्सव आपण साजरे करत असतो. दसऱ्याला दशानंद रावण च्या पुतळ्याचे दहन केले जाते. म्हणजे वाईट प्रवृत्तीचा नाश करून समाजाला योग्य चांगल्या मार्गाने मार्गक्रमण झाल्याचा संदेश दिला जातो. भारतीय संस्कृतीत दसऱ्याच्या दिवशी वाईट प्रवृत्तीचे दहन केले जाते. भारतीय संस्कृतीत दसऱ्याच्या दिवशी लोखंडाच्या वस्तू , गाड्या, सायकल इतर गोष्टींना स्वच्छ करून त्याची पूजा करतात व त्या वस्तूंचे आभार मानतात.तसेच भारतीय संस्कृती प्रमाणे जे वयाने मोठे व्यक्ती असतात त्यांना नमस्कार करण्याची व इतरत्र गावावर फिरण्याची प्रथा प्रचलित आहे. दसरा हा सण एकमेकांचा आदर करणे सुद्धा शिकवतो. मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळाचे लाडू बनविले जातात. आकाशात पतंगा उडविल्या जातात. या दिवशी कोणाचे वर्षभर भांडण असले तरी तिळगुळ



घ्या आणि गोड गोड बोला असे म्हटले जाते. मकर संक्रांतीचा उत्सव संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. या दिवशी लोक खूप सगळे तिळ आणि गुळ, पतंगा बाजारातून खरेदी करतात. भारतीय संस्कृतीत असे मानले जाते की या दिवसापासून दिवस हा थोडा थोडा मोठा होत जातो व उन्हाळ्याकडे या दिवसापासून प्रवास चालू होते. भारतीय संस्कृतीत शेतकरी पोळा हा सण मोठ्या उत्सवात साजरा करतात. शेतकऱ्यांसाठी बैल मोठ्या प्रमाणात शेतात कष्ट करतात. त्यामुळे चांगल्या प्रमाणात अन्नधान्य पिकते.भारतीय संस्कृतीत मनुष्याच्या खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी कष्ट करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते .त्याचे आभार व्यक्त केल्या जातात. त्यामुळे बाजारात लोक किराणा, वस्तूंसाठी तसेच बैलांच्या शृंगारासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करत राहतात. भारतीय संस्कृतीत धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केल्या जातात. जसे महादेवाचे उत्सव या निमित्ताने खूप ठिकाणी अनेक यात्रांचे, जत्रांचे आयोजन केले जाते. त्यामुळे भारतीय संस्कृतीत लोकं देवी देवतांना मोठ्या प्रमाणावर मानतात. त्यामुळे देवी देवतांच्या मंदिरासमोर अनेक दुकानांची निर्मिती झाली आहे. यात प्रसाद, बेलफुल, नारळ व पूजेसाठीचे इतर साहित्य यांची विक्री केली जाते. यातून लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. शेगावचे गजानन महाराज संस्थान, शिर्डीचे साईबाबा संस्थान, पंढरपूरचे विठ्ठलाचे संस्थान, कोल्हापूरचे महालक्ष्मीचे संस्थान, तुळजापूरचे भवानी मातेचे मंदिर, बालाजी संस्थान अशा अनेक संस्थांनांची निर्मिती ही धार्मिकतेतून झाली आहे. अनेक लोक येथे दर्शनासाठी जातात. त्यामुळे या संस्थानाच्या ठिकाणी अनेक व्यवसायांची निर्मिती झाली आहे. यातुन खूप लोकांना रोजगार मिळतो. तसेच अशा ठिकाणी पर्यटन स्थळाचा सुद्धा विकास झाला आहे. भारतीय संस्कृतीत लोकांचा देवी देवतांवर प्रचंड विश्वास व श्रद्धा असल्यामुळे अशा प्रकारची संस्थाने यातून निर्माण झाली. पर्यटन निर्माण झाले. लोकांना यातून रोजगार मिळायला सुरुवात झाली. भारतीय संस्कृतीत गणेश उत्सव ,दुर्गोत्सव इत्यादी साजरे केले जातात. त्यामुळे मूर्तिकार यांचे व्यवसाय झपाट्याने वाढले आहेत. धार्मिकतेला आपल्या संस्कृतीत खूप मान्यता असल्यामुळे, अनेक देवी देवतांच्या आरत्यांचे पुस्तके, धार्मिक पुस्तके व ग्रंथ यांची निर्मिती झाली आहे. पर्यायाने प्रकाशन व्यवसाय वाढले आहेत. पुस्तक निर्मिती व्यवसाय वाढले आहेत. अनेक बुक्स स्टॉलची निर्मिती यातून झाली. लोकांना यातून रोजगार निर्माण झाला. भारतीय संस्कृतीत अनेक महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. त्यामुळे अनेक मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते .त्यामुळे त्या कार्यक्रमासाठी लागणारे वेगवेगळे साहित्य लोक खरेदी करत राहतात. पर्यायाने वेगवेगळे व्यवसाय वाढीस लागतात. धार्मिक संस्कृतीचा प्रत्यक्ष व्यवसायाच्या विकासावर परिणाम होतो. भारतीय संस्कृतीत वेगवेगळ्या धर्मांचे लोकं राहतात. मुस्लिम लोक मोठ्या थाटामाटात ईद साजरी करतात . ख्रिश्चन लोकं ख्रिसमस साजरी करतात. पारशी लोकं पतेती मोठ्या उत्साहात साजरी करतात. पंजाबी लोकं त्यांचे उत्सव साजरे करतात. तर इतर जाती धर्मांचे लोक त्यांचे उत्सव साजरे करतात. त्यामुळे त्या त्या धर्मांचे लोक त्यांना पाहिजे असलेल्या वस्तूंची बाजारातून मागणी करतात. त्यामुळे यातून वेगवेगळ्या व्यवसायांची निर्मिती होते. यातून लाखो लोकांना रोजगार प्राप्त होतो. वेगवेगळ्या सण उत्सवाप्रसंगी त्या त्या धर्मांच्या संस्कृती प्रमाणे गाणी, कॅसेट, सीडीज निर्माण केल्या जातात. "सिंगिंग" या व्यवसायाला खूप जास्त प्रमाणात आता मागणी आहे. वेगवेगळ्या उत्सवाच्या वेळेला त्या त्या धर्माप्रमाणे, संस्कृतीप्रमाणे डान्सचे आयोजन केले जाते. डान्स प्रशिक्षण देणे हे व्यवसाय आज खूप मोठ्या प्रमाणात विकसित होत आहेत. कारण सर्वात जास्त क्रेझ लोकांना आता डान्स नि लावली आहे. वेगवेगळ्या उत्सवाप्रसंगी आपल्या संस्कृती प्रमाणे वेगवेगळ्या मालिका, चित्रपट तयार केले जातात. यातून समाजाचा आरसा समाजाला दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. यातून चित्रपटसृष्टी या व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. आपल्या देशात अनेक विविध जाती-धर्मांचे लोक राहतात. त्या त्या जाती-धर्मांच्या लोकांची सण, उत्सव, संस्कृती ही वेगवेगळी असते. त्यामुळे वेगवेगळे व्यवसाय समाजात जन्माला येतात. यातूनच लोकांच्या रोजगाराचा प्रश्न निकाली निघतो. दिवाळी असली की लोकं एकमेकांना गिफ्ट पाठवतात. वेगवेगळे ग्रीटिंगकार्ड पाठवतात. सुवासिक तेल वापरतात. फटाके, कपडे ,किराणा इतर आवश्यक वस्तूंची खरेदी करतात. यामुळे असं म्हणावे लागेल की वेगवेगळ्या सण उत्सवावर संस्कृतीचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होतो.

आधुनिक केसरी

# ऐतिहासिक दौलताबाद किल्ला



दौलताबाद हे महाराष्ट्रातील एक शहर आहे. त्याचे प्राचीन नाव देवगिरी आहे. मुहम्मद बिन तुघलकची राजधानी. हे औरंगाबाद जिल्ह्यात आहे. हे शहर नेहमीच शक्तिशाली सम्राटांच्या आकर्षणाचे केंद्र म्हणून सिद्ध झाले आहे. दौलताबादची मोक्याची जागा अत्यंत महत्त्वाची होती. हे उत्तर आणि दक्षिण भारताच्या मध्यभागी आहे. येथून अख्ख्या भारतावर राज्य केले जाऊ शकते. या कारणास्तव, सम्राट मुहम्मद बिन तुघलक यांनी त्याची राजधानी केली. त्याने दिल्लीतील सर्व लोकांना दौलताबाद येथे जाण्याचे आदेश दिले. पण तेथील परिस्थिती व सर्वसामान्यांच्या दुः खामुळे त्याला काही वर्षांनी पुन्हा राजधानी दिल्लीत आणावी लागली. दौलताबाद हे 14 व्या शतकातील औरंगाबादच्या पश्चिमेस 14 कि.मी. वसलेले शहर आहे.

सुरुवातीला या किल्ल्याचे नाव देवगिरी होते, हे राष्ट्रकूट राज्यकर्त्यांनी बांधले होते. कैलास लेणी तयार केली. त्याच्या बांधकामाच्या वर्षापासून ते इ.स. 1762 पर्यंत या किल्ल्यावर बरेच राज्यकर्ते दिसले. गडावर यादव, खिलजी, तुघलक घराण्याचे राज्य होते. मुहम्मद बिन तुगलक यांनी देवगिरीला आपली राजधानी बनवून त्याचे नाव दौलताबाद असे ठेवले. आज दौलताबादच्या नावाचा उल्लेख भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांमध्ये आहे. दौलताबाद किल्ला हा मध्ययुगीन डेक्कनमधील सर्वात शक्तिशाली किल्ला होता. हा एकमेव किल्ला आहे ज्यावर कोणी विजय मिळवू शकला नाही.

या किल्ल्यात पाण्याच्या विहिरी, बरदरी, जलाशय, मीनार, हम्माम, विविध वाड्या, मंदिरे, मशिदींसह इतर अपूर्ण रॉक-कट लेण्या आहेत. दौलताबाद हा भव्य टेकडी किल्ल्यासाठी प्रसिद्ध आहे. 1990 मीटर उंचीचा हा किल्ला सुळकाच्या आकारात आहे. गडाच्या बाहेरील भिंत आणि किल्ल्याच्या पायथ्या दरम्यान भिंतींच्या तीन जाड ओळी आहेत ज्यावर अनेक बुरुज बांधल्या आहेत. या उद्यानात प्राचीन देवगिरी शहर वसलेले होते. या किल्ल्याबद्दल लक्षात घेण्याजोगी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे येथे अनेक भूमिगत कॉरीडोर आणि अनेक खंदक आहेत. हे सर्व खडक कापून बनविलेले आहेत. या किल्ल्यात एक अंधाऱ्या भुयारी मार्ग असून त्याला अंधेरी म्हणतात. या मार्गावर काही ठिकाणी खोल खड्डेदेखील आहेत, जे शत्रूला खोल दरीमध्ये बनवण्यासाठी बनवले गेले. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर लोखंडाच्या मोठ्या रिंग आहेत ज्यात बाहेरून आक्रमण करणाऱ्याना रोखण्यासाठी अग्नी पेटवण्यासाठी धूर वापरला जात होता. चांद मीनार, चिनी महल आणि बारादरी हे या किल्ल्याचे मुख्य स्मारक आहेत. चांद मीनारची उंची 63 मीटर आहे आणि अलाउद्दीन बहमनी शहा यांनी 1435 मध्ये दौतालाबादवरील विजयाच्या स्मरणार्थ ती बांधली. जामा मशीद मीनारच्या अगदी मागे आहे. या मशिदीचे खांब मुख्यतः मंदिराला लागूनच आहेत. त्या जवळच चिनी राजवाडा आहे जिथे गोलकोंडाचा शेवटचा शासक अब्दुल हसन ताना शाह याला औरंगजेबाने 1687 मध्ये तुरूंगात टाकले होते. औरंगाबाद ते दौलताबाद अंतर उत्तर-पश्चिमेस 14 कि.मी. क्षेत्रात आहे. सुरुवातीला हा किल्ला देवगिरी म्हणून ओळखला जातो.दौलताबाद किल्ल्याचे बांधकाम राष्ट्रकुटा राजवंशाने केले होते, ज्याने कैलास गुहा बांधली होती, ती 1187-1318 पासून सन 1762 पर्यंत बांधण्यात आली होती.

# शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम दर्जाहीन

## मुरमाऐवजी काळ्या मातीचा वापर : केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** जगप्रसिद्ध लोणार शहर हे पर्यटनस्थळ असल्याने लोणार शहराला जागतिक दर्जा प्राप्त झाला. शहरातून शेगाव-पंढरपूर (पालखी) राष्ट्रीय महामार्ग शहराच्या मध्यभागीतून गेला रस्त्याचे कामाला सुरुवात झाली. परंतु संबंधित ठेकेदार व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या आशीर्वादाने या रस्त्याचे काम अजून चार वर्षे उलटूनसुद्धा काम पूर्ण झाले नाही. शहरातून रस्ता सुरू झाला परंतु रस्त्याच्या बाजूला खोदून ठेवलेली जागेवर मुरमाचा भरणा करणे आवश्यक असताना त्या जागेवर काळी मातीचा भरणा करण्यात येत आहे. त्यामुळे हा शेगाव पंढरपूर पालखी रस्ता दर्जाहीन होत असल्याचा चर्चा होत आहे. मागील चार महिन्यापासून पावसाळ्याच्या दिवसांमध्ये रस्त्याच्या बाजूला असलेले व्यापारीवर्गांची दुकानासमोर मोठी पाण्याची साचले होते तर काही दुकानांमध्ये पाण्याने प्रवेश केला होता या रस्त्याच्या



कासव गतीने होणाऱ्या कामांमध्ये नागरिकांची नाराजी दिसून येत आहे. पावसाळ्यानंतर संबंधित विभागाला रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यांमध्ये काळी मातीची मलमपट्टी करण्याची काम सुरू आहे. रस्ता जागोजागी खाली वर झाला आहे शिवाय एखाद्या कॉलनी मध्ये जाण्यासाठी जो रस्ता नाली वरून तयार केला आहे त्या ठिकाणी सिमेंट चे पाईप न टाकता तसेच नालीच्या साद्या स्लॅब वर आहे त्या मुळे आत अनेक घर बांधकामाचे साहित्य नेण्यासाठी जड वाहने न्यायची असल्यास ती जात नाहीत बऱ्याच ठिकाणी जड वाहने नेताना ती नालीत गेल्याच्या घटना घडल्या आहे लोणार शहरातील व्यापारी नागरिक शेतकरी यांनी अनेक वेळेस निष्कृष्ट दर्जेच्या कामाच्या संदर्भात अनेक




वेळा तक्रारी करून सुद्धा झोपेचे सोंग घेणारे महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाचे अधिकारी व ठेकेदार दुर्लक्ष करत आहे. जोपर्यंत शहरातील रस्त्याची कामे उत्कृष्ट दर्जाचे होत नाही तोपर्यंत या रोडवर असलेले टोल सुरू करण्यात येऊ नये. रस्त्याच्या बाजूला काळी मातीची भरणा करणे हे तात्काळ थांबावे अन्यथा शहरवासीयांना सोबत घेऊन भाजपा युवा मोर्चा तर्फे जनआंदोलन करण्यात येईल.व संबंधित ठेकेदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी भाजप चे युवा मोर्चा चे तालुका अध्यक्ष शुभम बनमेरू यांनी निवेदनाद्वारे रस्ते व वाहतूक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.



# शेतकऱ्यांकडून दुपटीपेक्षा जास्त रक्कम वसूल करू नये : रामनाथ राजपूरे

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** बालमटाकळी येथे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन हरिश्चंद्र घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. संस्थेचे सचिव भीमराव निर्मळ यांनी अहवालाचे वाचन केले तर संस्थेचे माजी चेअरमन रामनाथ राजपुरे यांनी संस्थेविषयी मार्गदर्शन करताना म्हणाले की सोसायटीचे जुने थकबाकीदार आहेत. ज्या शेतकऱ्याचे मुद्दल कर्ज आहे त्यांचे दुपटीपेक्षा जास्त पैसे घेऊ नये. वन टाइम सेटलमेंट राष्ट्रीयकृत बँका करतात , मग ही सहकारी बँक आहे तरी देखील शेतकऱ्यांसाठी काही करू शकत नाही, तेव्हा सहकार बँकेने वन टाइम सेटलमेंट करावी, जिल्हा बँकेने व संचालक मंडळाने हा निर्णय घ्यावा आणि अशा थकीत शेतकऱ्यांना पुनर्गठित करून पुन्हा प्रवाहात आणावे आणि त्यांना कर्ज वाटप करावे अशा प्रकारचा ठराव संमत करण्यात आला. जिल्हा बँक शाखेची इमारत मोडकळीस आल्याने नविन इमारत बांधकाम करण्यासाठी ठराव व काही शॉपिंग सेंटरसाठी जुनी इमारत, गाळे पाडून नव्याने इमारत, शॉपींग सेंटरसाठी गाळे बांधण्यासाठी ठराव घेण्यात आला. यावेळी व्हाईसचेअरमन रतनराव देशमुख, माणिकराव शिंदे, बाळासाहेब जाधव, दत्तात्रय भिसे, व्यंकटराव देशमुख, बाबासाहेब सोनवणे, उमेश घाडगे, मधुकर पाटेकर, संदीप देशमुख, बाबासाहेब भाकरे, बाळभाऊ देशमुख, पांडूरंग वैद्य, काकासाहेब भाकरे, अशोक वाघुंबरे, नारायण राजपुरे, दादा सोनवणे, गायके यांच्यासह सभासद उपस्थित होते.

# आष्टी जि. प. शाळेचे मुख्याध्यापक रगडे यांची शिक्षण विभागाकडून होणार चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील आष्टी जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक सुरेश रगडे यांची शालेय पोषण आहार योजनेत अनियममितता व आर्थिक गैरव्यवहाराबाबत खुलासा सादर करणे या संदर्भात राहुल कैलास आवटे यांनी आमच्या कार्यालयास दिलेले लेखी निवेदन दिनांक २०/९/२०२२ संदर्भिय पत्रान्वये राहुल कैलास आवटे यांनी नमूद केलेल्या प्रवर्तन शिक्षकीय पेशा पदास अशोभणीय आहे. सुरेश रगडे मुख्याध्यापक जि.प. शाळा आष्टी ता. परतूर हे शाळेवर सतत गैरहजर राहतात, विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात मोठ्या गफलत करतात, गणवेशात गफलत करतात. शाळेच्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणेतर लांबच साधा माहितही होत नाही, परस्पर मिळलेल्या योजना उचलतात, पोषण आहारातील सामान विकणे, तांदुळ, दाल, तेल, मसाले खोट्या स्वाक्षरीने शाळेच्या खात्यातील पैसे उचलून स्वतःच्या घरासाठी वापरतात. मागील काही दिवसांपूर्वी त्यांनी क्लार्कचे नाव टाकून त्याच्या खोट्या स्वाक्षरीने बँक ऑफ महाराष्ट्र येथे बिले उचलण्याचा प्रकार झाला. पण तो प्रकार वरिष्ठांच्या मदतीने दाबण्यात आला असून असे




अनेक आर्थिक गैरव्यवहार शाळेच्या खात्यातून झाले आहे. शाळेच्या संपूर्ण खात्याची चौकशी करण्यात यावी झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन रगडे यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करून त्यांना निलंबित करण्यात यावे अशा प्रकारची तक्रार शिक्षण विभागाच्या कार्यालयास दिलेली आहे. तर शाळेत सतत अनाधिकृतपणे गैरहजर राहणे, वरिष्ठांचे आदेश व सुचनांचे पालन न करणे, शालेय पोषण आहारात गफलती करणे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दैनंदिन मध्यान्ह भोजनापासून वंचित ठेवणे, शालेय पोषण आहारात तफावत असणे, कर्तव्यात कसूर करणे. अशा या बाबीवर शासकीय कर्मचाऱ्यास आवश्यक सचोटीचे पालन न करणे शालेय अभिलेख अपूर्ण ठेवणे, प्रशासनाची दिशाभूल करणे, मुख्याध्यापक पदास विहीत केलेली कर्तव्ये व जवाबदाऱ्या यांचे पालन न करणे आपल्या या कृती महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम व मधील तरतुदीचा भंग करणा-या आहेत सबब आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ३ नुसार निलंबीत करून विभागीय चौकशीची कार्यवाही का करण्यांत येवू नये? या बाबतचा लेखी खुलासा हा नोटीस मिळाल्यापासून चार दिवसाचे आत गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, परतूर यांचे मार्फत सादर करावा विहीत मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास वरील प्रमाणे एकतर्फा कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल तर गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, परतूर यांना सदर नोटीस तीन प्रतिमध्ये देवून सूचित करण्यात येते की, संबंधीतास एक प्रत तामिल करुन तामिल प्रत खुलाशासह तात्काळ या कार्यालयास सादर करावी. विलंब झाल्यास विलंबाची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.

# महावितरणमधील ऑपरेटर्स देणार आझाद मैदानावर धरणे..!

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणमधील ऑपरेटर कर्मचारी उच्च वेतन वाढीच्या मागणीसह उपकेंद्रांच्या इतर मागण्यांसाठी आझाद मैदान मुंबई येथे १० ऑक्टोबर पासून धरणे आंदोलन करणार आहेत. हा प्रश्न १६ वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर महावितरण प्रशासन सातत्याने वेळ काढू पणा करीत आहे. अनेक सरकारे बदलली, परंतु प्रश्न सुटले नाहीत. प्रश्नांची दखल घेत नसल्याने महाराष्ट्र राज्य विद्युत ऑपरेटर्स संघटनेने लोकशाही मार्गाने धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यानिमित्ताने राज्यभरातील महावितरण ऑपरेटर्स कर्मचारी आझाद मैदान मुंबई येथे १० ऑक्टोबरला प्रचंड धरणे आंदोलन करणार असल्याचे संघटनेचे सरचिटणीस नवनाथ पवार यांनी कळविले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, सन २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे तीन कंपन्यांमध्ये विभाजन



झाले. एक सूत्रधार कंपनी म्हणून या तिन्ही कंपन्यावर नियंत्रक म्हणून काम करते. मंडळ विभाजनापूर्वी ३३ के. व्ही. उपकेंद्रात काम करणारे ऑपरेटर्स बढतीने अतिउच्च दाबाच्या उपकेंद्रात जात होते. परंतु मंडळ विभाजनानंतर अतिउच्च दाबाची सर्व उपकेंद्रे महापारेषण कंपनीत समाविष्ट करण्यात आल्यामुळे ३३ के. व्हि. उपकेंद्रांच्या ऑपरेटरचे पदोन्नती चॅनल नष्ट झाले. मंडळ विभाजन करताना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात कोणत्याही पदाचे वेतन, भत्ते, पदोन्नतीवर विभाजनाने कोणताही परिणाम होणार नाही, असे नमूद केलेले असूनसुद्धा ऑपरेटर कॅडर वर आर्थिक अन्याय होत आहे. उशिराने व कमी वेतनाच्या पदावर सध्या ऑपरेटरांना पदोन्नती देण्यात येते. याशिवाय नोकरीस लागताना समान मूळ वेतनाच्या पदावरील कर्मचाऱ्यांपैकी तांत्रिक कर्मचाऱ्यांना पहिल्या जि. ओ. नंतर कमी वेतन दिले जावे, अशी मानवनिर्मित वेतन तफावत करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता ज्या कामात जास्त धोका असतो, ते काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन व इतर भत्ते जास्त असतात. परंतु महावितरण मध्ये नेमके याच्या उलट आहे. धोकादायक काम करणाऱ्या ऑपरेटर व तांत्रिक कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन कमी आहे. तर खुर्चीवर बसून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत जास्त पगार मिळतो. असा दुजाभाव कंपनीकडून करण्यात येत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या सर्व कारणांमुळे तांत्रिक कामगरांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत ऑपरेटर्स संघटनेने गेली पाच वर्षे वीज प्रशासनासह, ऊर्जामंत्री व मुख्यमंत्री कार्यालयात सातत्याने पत्र व्यवहार करून न्याय देण्याची मागणी केली होती. परंतु प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने संघटनेने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या धरणे आंदोलनात संघटनेचे केंद्रीय पदाधिकारी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य, महाराष्ट्रभरातील ऑपरेटर्स, तांत्रिक कर्मचारी, सहाय्यक कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून या धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये, उपाध्यक्ष विश्वास साळुंके, कार्याध्यक्ष सुधीर इंगळे, उपसरचिटणीस खेमराज तिवाडे, उपसरचिटणीस राजेश बडनखे, कोषाध्यक्ष राजेश्वर क्षीरसागर, महेश अहिरे, रामनाथ नागरगोजे, सादिक शेख, नितीन सोनकुसरे, माधव गोरकवाड, लक्ष्मण वाघ, महादू कड, प्रफुल्ल शेरकी, यशवंत गंबरे, सुनील बोयनर, राजेंद्र कुंभार, अशोक भुसेवार, हरिदास नागरे, कु. शितल शिवपुजे, किरण पोवार, आनंद कोटकर या केंद्रीय कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

तत्कालीन वीज मंडळात एकाच दिवशी नोकरीस लागलेले, एकाच वयाचे, एकाच कॅटेगरीच्या दोन ऑपरेटर पैकी जो आजच्या महापारेषण कंपनीत जाऊ शकला, त्याचे वेतन तब्बल १८ ते २२ हजार रुपयांनी जास्त आहे . हा फरक वर्षा गणित वाढत जात आहे . त्यामुळे महावितरण मधील ऑपरेटर वर्गाचे प्रचंड आर्थिक शोषण होत आहे . हक्काची उच्च वेतनाची पदे नष्ट केल्यामुळे व पदोन्नतीची पदे निर्माण न केल्यामुळे हे आर्थिक नुकसान होत आहे .

### कंपनीचे खाजगीकरण धार्जिणे धोरण

१ एप्रिल २०१९ नंतर कार्यान्वित करण्यात आलेल्या सर्व नवीन उपकेंद्रात केवळ कंत्राटी ऑपरेटर भरण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे . ज्यामुळे कायम ऑपरेटरच्या पदोन्नतीच्या जागा कमी झाल्या असून आतापर्यंत २१० उपकेंद्रे खाजगी कंत्राट दाराकडून चालविण्यात येत आहेत . कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली उपकेंद्रे खाजगी कंत्राटदारांना चालवायला दिल्याने औद्योगिक सुरक्षा धोक्यात आली आहे . कंपनीच्या खाजगीकरण धोरणांमुळे कर्मचारी वर्ग प्रचंड नाराज आहे .

# ...तर महानगरपालिका बीओटी तत्वावर द्या : कपिल दामोदर

## हिरामण गवळींवर मानहानी दावा दाखल करावा : भाजपाने खुलासा करावा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिकेचे भारतीय जनता पक्षाचे स्विकृत नगरसेवक हिरामण विठ्ठल गवळी यांनी धुळे महानगरपालिकेचे आयुक्त यांना भारतीय जनता पक्षाच्या लेटरहेडवर कपिल दामोदर नावाची व्यक्ती ही सतत अर्ज करुन नागरिक व व्यापाऱ्यांना त्रास देत असून त्यांची चौकशी करावी असे निवेदन दिलेले होते तसेच भिमशक्ती या सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी धुळे यांना भिमशक्ती या सामाजिक संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे महासचिव व धुळे जिल्हाध्यक्ष कपिल दामोदर यांच्या नेतृत्वाखाली धुळे महानगरपालिकेचे भारतीय जनता पक्षाचे स्विकृत नगरसेवक हिरामण विठ्ठल गवळी यांच्यावर मानहानी दावा दाखल होऊन चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी केली हिरामण गवळी यांनी धुळे महानगरपालिकेचे आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कपिल दामोदर नावाची व्यक्ती ही सतत अर्ज करुन नागरिक व व्यापाऱ्यांना त्रास देत आहे व धुळे महानगरपालिकेतील प्रशासन त्यांच्या अर्जाची तात्काळ दखल घेऊन व्यापारी व नागरिकांना महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी नोटीसा देत आहेत, असे निवेदन श्री . हिरामण गवळी यांनी मा . आयुक्त धुळे मनपा धुळे यांना दिलेले आहे. कपिल दामोदर यांनी जिल्हाधिकारी धुळे यांना निवेदन देऊन निवेदनात पुढे म्हटले आहे की , आमच्या नावावर बिनबुडाचे खोटे आरोप करुन निवेदन दिलेले आहे. परंतु धुळे महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची एकहाती सत्ता असून महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती असून लोक प्रतिनिधींना महानगरपालिका प्रशासन चालविता येत नसेल तर दोष कुणाचा ? काही लोकप्रतिनिधींना महानगरपालिका प्रशासनात कामकाज करता येत नसेल तर बीटीओ तत्वावर महानगरपालिका आम्हास चालविण्यास द्यावी असे दामोदर यांनी म्हटले . तसेच ज्या व्यापायांच्या नावाने मनशक्ती या सामाजिक संघटनेच्या वतीने धुळे महानगरपालिका आयुक्त, नगररचनाकार धुळे महानगरपालिका यांच्या निदर्शनास काही मोजके व्यापारी बेकायदेशीर बांधकाम करून जागेतील वापरात बदल न करता जिल्हा प्रशासनाची कुठल्याही प्रकारचा शासकीय महसुल न भरता बेकायदेशीर कामकाज करुन मनमानी कारभार चालवित आहे असा आरोप ही केला यातील काही व्यापारी हे बलाढ्य धनवान असून त्यांची बाजू कुठलेही ज्ञान नसून कुठल्याही प्रकारचा अभ्यास न करता काही व्यापाऱ्यांची कागदपत्रे कायदेशीर



आहेत की नाही याची शहानिशा न करता हिरामण विठ्ठल गवळी हे बिनबुडाचे खोटे आरोप करीत आहेत हे सिध्द झालेले असतांना यांच्याकडे आम्ही व्यापाऱ्यांना त्रास देत असल्याचे कुठलेही पुरावे नसतांना खोटे - नाटे , बिनबुडाचे नाटक करीत आहे. त्यांच्याकडे ज्या काही मोजक्या व्यापाऱ्यांना धुळे महानगरपालिका यांनी नोटीसा दिलेल्या आहेत, त्या व्यापाऱ्यांची नावे हिरामण विठ्ठल गवळी यांनी व ज्यांना नोटीसा गेलेल्या आहेत, अशा व्यापाऱ्यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना तक्रार करावी. हिरामण विठ्ठल गवळी त्यांच्यावर मानहानी दावा दाखल करुन, कायदेशीर चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी केली. काही मोजके व्यापाऱ्यांच्या विरोधात तक्रार केली असल्याने व्यापारी हे बलाढ्य धनवान असल्याने माझ्या जीवीतास धोका आहे . तसेच भारतीय जनता पक्षाच्या लेटरपॅडचा वापर करुन निवेदन दिलेले आहे व हिरामण गवळी हे नगरसेवक पदाचा दुरुपयोग करीत आहेत . हिरामण विठ्ठल गवळी यांचा मागचा खरा सुत्रधार व पक्षाचे खरे सुत्रधार कोण ? याची शहानिशा करुन याचा देखील शोध घेऊन चौकशी करून कारवाई करण्यात यावी. यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो . धुळे मा . आयुक्त व नगररचनाकार महानगरपालिका धुळे यांनी बेकायदेशीरपणे बांधकाम करुन शासकीय महसुल बुडविणारे काही मोजके व्यापाऱ्यांना कायदेशीरपणे नोटीसा देण्यात आलेल्या आहेत . वेळ आल्यास भिमशक्ती या सामाजिक संघटनेच्या वतीने धुळे मा . आयुक्त व नगररचनाकार यांना काही मोजके व्यापारी बेकायदेशीर बांधकाम करुन कुठल्याही प्रकारचा जमीनीत बदल न करुन शासनाचा महसुल बुडवित असणाऱ्यांचे पुराव्यासह नावे जाहीर करू. हिरामण विठ्ठल गवळी यांनी भारतीय जनता पक्षाच्या लेटरपॅडचा वापर करुन निवेदन दिलेले आहे. हिरामण विठ्ठल गवळी यांचा मागचा खरा सुत्रधार व पक्षाचे खरे सुत्रधार कोण ? भारतीय जनता पक्षाचे लेटरहेडवर निवेदन देण्यात आलेले असून भारतीय जनता पक्षाची भूमिका काय याचा देखील खुलासा करावा. भविष्यात अनेक निवडणुका असून आम्ही दलित समाजाला एकत्र करून भविष्यात कोणाच्या पाठीमागे उभे राहू याचा विचार करण्यात येईल परंतु धुळे शहरामध्ये रस्ते, गटारी, पाणी प्रश्न व अतिवृष्टीमुळे गोरगरीबांचे जनतेचे नुकसान झाले. त्यावेळेस लोकप्रतिनिधी म्हणून नगरसेवक असलेले हिरामण विठ्ठल गवळी हे कोठे होते? असेही एका पत्रकाद्वारे भिमशक्तीचे महाराष्ट्र राज्याचे महासचिव तथा धुळे जिल्हाध्यक्ष कपिल दामोदर यांनी कळविले आहे. याप्रसंगी भिमशक्ती या सामाजिक संघटनेचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवीभागवत मनुष्य जीवनात यशदायी : भागवताचार्य बंडा महाराज लखमापूरकर

आधुनिक केसरी न्यूज



**शिरवाडे वाकद :** देवी भागवत कथा श्रवण केल्याने मनुष्य जीवन यशदायी बनते व संसार भवसागरांतुन वाचण्यासाठी ही कथा नवरात्रांच्या पर्व काळांवर श्रवण करणे एक महान पुण्यपद आहे असे प्रतिपादन ह.भ.प भागवताचार्य बंडा महाराज लखमापुरकर यांनी दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी येथे आयोजित नवरात्रीनिमित्ताने देवी भागवत कथेवेळी प्रतिपादीत केले.

नवरात्र पर्व काळांचे औचित्य साधुन दिंडोरी तालुक्यातील मातेरेवाडी येथे ग्रामस्थांनी संगीतमय देवी भागवत कथेचे भव्य दिव्य आयोजन केले आहे. या कथेच्या श्रवणांसाठी मातेरेवाडी, वरखेडा, राजापूर, लखमापुर, लोखंडेवाडी,जोपुळ तसेच तालुक्यातील विविध ठिकाणंचे भाविक भक्त मोठ्या संख्येने येत आहे. यावेळी देवी भागवत कथेमध्ये असलेल्या देवी माहात्म्य, देवी अवतारांच्या विविध कथा ,५१ शक्तिपीठांची निर्मिती, साडेतीनपीठ निर्मिती इ.विषयावर बंडा महाराज यांचे संगीतमय कथेतून ऐकायला मिळत आहे. नवरात्र आणि देवी महिमा हे समीकरण कसे असते व त्यातून भाविक भक्तांना जो साधने आनंद कसा मिळतो हे पटवून देण्याकरिता बंडा महाराज लखमापुरकर यांनी अठरा पुराणांमध्ये जे दाखले दिले आहे ते श्रोता वर्गाला आपल्या वाणीतून समजावून सांगितले. कथेसाठी संगीत साथ संगीत संयोजक ह.भ.प गायनाचार्य किरण महाराज सुर्यवंशी गाजरवाडीकर, संगीत विशारद सचिन महाराज सानप धारणगावकर, ह.भ.प पार्थ महाराज सुर्यवंशी, गायनकोकिळा प्रिती दिदी सुर्यवंशी, पखवाज विशारद प्रविण महाराज बार्डीकर, ऋषिकेश महाराज कोटकर यांची मोलाची संगीत साथ मिळत आहे.



## पैठणच्या शालिवाहन संस्थेतर्फे केदार खंडागळे यांना 'जीवन गौरव' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने कर्मचारी केदारनाथ खंडागळे यांना 'जिवन गौरव' पुरस्कार देऊन वार्षिक सभेत सपत्नीक सत्कार करण्यात आला. सलग २५ वर्षें पिग्मी एजंट म्हणून ते कार्यरत आहेत. संत ज्ञानेश्वर उद्यान मार्गावरील महेश्वरी धर्मशाळा सभागृहात ही वार्षिक सभा पार पडली. यावेळी बोलताना चेअरमन किशोर चव्हाण यांनी सांगितले की, 'संस्थेच्या स्थापनेपासून केदारनाथ खंडागळे हे पिग्मी एजंट म्हणून कार्यरत आहेत. सचोटी व निष्ठेने काम करत असताना संस्थेच्या हितासाठी त्यांनी दिर्घकाळ सेवा केली. व अजुनही कार्यरत आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. केदारनाथ खंडागळे व राजश्री केदारनाथ खंडागळे यांना शालश्रीफळ व सन्मानपत्र देऊन 'जीवन गौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्हा. चेअरमन डॉ जयंत जोशी, सचिव प्रकाश कासलीवाल, संचालक दीपक आहुजा, गणेश लोहीया, दीपक लखमले, बाबासाहेब राऊत, डॉ. पंडित किल्लारीकर, सुनील शेळके, ॲड. राजेंद्र गोर्डे, सुमनबाई म्हस्के व सुमनबाई चौहान उपस्थित होते.

## फैयाज इनामदार यांना पीएच.डी.

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** जिल्हा परिषद उपशिक्षक फैयाज अ.रऊफ इनामदार यांना राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (Ph.D) पदवी प्राप्त झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे सादर केलेल्या मौलाना अबुल कलाम आझाद यांचे हिंदू-मुस्लिम एकता आणि राष्ट्रीय एकात्मते संबंधातील विचारांचा चिकित्सक अभ्यास या विषयात आपला शोध निबंध सादर केला. त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.एस. शाकीर यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या या यशाबद्दल पं.स. पंढरपूर गटशिक्षणाधिकारी महारुद्र नाळे, करकंब केंद्रप्रमुख आप्पासाहेब माळी, जि.प. प्रा.शाळा जानकरवस्ती, जानकरवस्ती मुख्याध्यापिका मंगल जाधव, दत्तात्रय खंदारे, विजया उंडे मॅडम, हेमंत कदम, डॉ. अर्जुन माने, शेखर कोरके, विजय शिंदे, बापू माने, संजय सांगोलकर, तानाजी जानकर, विजय कोळेकर, संजय जानकर, अनंत लांडे, फिरोज कोरबू, सचिन कापसे, गजेंद्र रेडे,आप्पा थोरात, रवींद्र जानकर, बाळासाहेब घाडगे, शहाजी शेटे, प्रशांत सूळ, प्रदीप चव्हाण, औदुंबर शेटे, मोहसीन कोरबू, बाळू खडके, संदीप घाडगे, शंकर रेडे यांनी त्यांचे अभिनंदन केले. फैयाज इनामदार हे जि.प. प्रा. शाळा जानकर वस्ती, करकंब ता.पंढरपूर येथे उपशिक्षक पदावर कार्यरत आहेत.

# सर्वांच्या सहभागामुळे उपक्रमाचे रूपांतर लोकचळवळीमध्ये

## जि.प. सीईओ दिलीप स्वामी : सायकल बँक उपक्रमांतर्गत मुलींना सायकल वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जिल्ह्यातील विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सर्वांनी हिरीहिरीने सहभाग घेतला त्यामुळे स्वच्छ शाळा सुंदर शाळा, सायकल बँक, दशसूत्री या उपक्रमांचे लोक चळवळीमध्ये रूपांतर झाले आहे. जिल्ह्यातील विविध स्तरावरील पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक व पालक यांच्या सक्रिय सहभागाने समाजाला त्याचा लाभ होत आहे, असे मत सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिकानगर येथे शाळेत लोकसहभागातून करण्यात आलेल्या विविध कामांचा लोकार्पण सोहळा व बाळे केंद्रातील



शिक्षकांच्यावतीने सायकल बँक उपक्रमांतर्गत मुलींना सायकल वाटप कार्यक्रम आयोजन सीईओ दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर सोलापूर तालुक्याचे गट विकास अधिकारी डॉ. जास्मिन शेख, गटशिक्षणाधिकारी बापूराव जमादार, जिल्हा परिषद शिक्षण विभाग मुख्यालयाचे शिक्षण विस्तार अधिकारी हरीश राऊत व प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे हे उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. अंबिकानगर शाळेत शिक्षकांची वर्गणी व लोकसहभागातून शाळेसाठी प्रवेशद्वार, संरक्षक भिंत, स्वच्छ शाळा सुंदर शाळा अंतर्गत शाळेचे रंगरंगोटी इत्यादी कामे करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने सोलार स्मार्ट डिजिटल क्लासरूमची निर्मिती करण्यात आली आहे. याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. बाळे केंद्र अंतर्गत येणाऱ्या विविध शाळेतील शिक्षकांच्या वर्गणीतून सायकल बँक उपक्रमांतर्गत मुलींना सायकल वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्रिसिजन फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, उत्तर सोलापूरचे गटविकास अधिकारी डॉक्टर जास्मिन शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक केंद्रप्रमुख विठ्ठल सिंह राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन सिद्धाराम माशाळे व श्रीमती रसिका बंदीछोडे यांनी केले. आभार चंद्रकांत बिराजदार सर यांनी मानले. यावेळी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष म. ज. मोरे, डायटचे विषय सहाय्यक बाळासाहेब वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मी कनकधर व उपाध्यक्ष सौ कल्पना आडगळे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील श्रीमती रंजना काटकर, वैशाली गोंदकर, तेजश्री ढगारे, शिवशंकर राठोड, शिवाजी वडते अनिल जाधव व बाळे केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांनी परिश्रम घेतले.

# 'रुरल जुगाड स्पर्धेत' जिंकले पहिले पारितोषिक

## जिजाई ट्रेलर आणि इक्विपमेंट कंपनीच्या 'सेल्फ ड्राइव्ह हेवी ड्युटी ट्रेलर' ने वाढवली शेतमालाची वाहन क्षमता

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सीआयआय यंग इंडिअन्स संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या 'रुरल जुगाड स्पर्धेत' मॅजिकच्या जिजाई ट्रेलर आणि इक्विपमेंट या स्टार्टअप्सने पहिले पारितोषिक पटकावले आहे. ग्रामीण आविष्कारांना आपल्या उत्पादनाच्या माध्यमातून शाश्वत सामाजिक प्रभाव निर्माण करू शकेल अशा कल्पना, उत्पादन असलेल्या स्टार्टअप्सकरिता या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण भागातील विविध समस्यांचे निराकरण करणाऱ्या नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सना निवडून, नेटवर्किंगद्वारे त्यांना उत्पादन विकसित करण्यासाठी मदत केली जाणार आहे. यासाठी सीआयआयने यंग इंडिअन्स संस्थेच्या देशपातळीवरील ५२ केंद्रांच्या माध्यमातून स्पर्धेकरिता सहभाग आमंत्रित केला होता. यामध्ये मॅजिकचे दोन स्टार्टअप्स यंग इंडिअन्स-औरंगाबाद केंद्राच्या माध्यमातून



सहभागी झाले होते. ग्रासरूट इनोव्हेशनवर काम करणारे या दोन्ही स्टार्टअप्सनी स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. या स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार औरंगाबाद येथील मॅजिक संस्थेत इन्क्युबेट होत असलेल्या असलेल्या अक्षय चव्हाण या नवउद्योजकाच्या 'जिजाई ट्रेलर आणि इक्विपमेंट कंपनी'ने पटकावला आहे. अक्षय यांनी 'सेल्फ ड्राइव्ह हेवी ड्युटी ट्रेलर'ने ट्रक्टर आणि ट्रोली याची क्षमता वाढणारे उत्पादन विकसित केले असून, या उत्पादनाचा मोठा फायदा शेतमाल वाहतुकीदरम्यान होणार आहे. सध्या वापरात असलेल्या वाह्नानांमध्ये जास्त भारामुळे इंधनाचा वापर जास्त होतो तसेच वाहतूक प्रक्रियेला वेळ लागतो. दुहेरी ट्रेलर वाहून नेणे असुरक्षित आहे आणि अपघाताची शक्यता वाढवतात. घाट रस्त्यावर चालवणे धोकादायक आहे आणि जास्त भार खेचल्यामुळे देखभाल खर्च वाढतो तसेच दुप्पट लांबीच्या आकारामुळे रस्त्यावर वाहन चालवणे नेहमीच कठीण असते, या वर उपाय म्हणून अक्षयने स्वतः विकसित केलें 12 फॉरवर्ड आणि 2 रिव्हर्स गीअर्ससह गिअरबॉक्स आणि अतिरिक्त ब्रेक चेंबर ट्रॅक्टर हायड्रॉलिक जोडला, मोठ्या आकाराच्या ट्रोलीमुळे माल वाहन क्षमता २५ टन वून ३५-४० टन होणार आहे तसेच वाहन क्षमतेमध्ये सुधार होऊन ट्रक्टरची ४०% पर्यंत इंधनाची बचत होणार आहे. मॅजिकचे संचालक सुनील रायथत्ता म्हणाले कि ग्रामीण भागातून येणाऱ्या स्टार्टअप्सना या स्पर्धेतून मोठे व्यासपीठ मिळवण्याची, तसेच आपले उत्पादन अधिकाधिक लोकांपर्यंत नेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

या पुरस्काराबद्दल बोलतांना अक्षय म्हणाला कि, शेती उपयोगी उत्पादन विकसित करण्याचा प्रयत्न केला, शेतकऱ्यांना आपल्या मालाची वाहतुकीसाठी येणाऱ्या समस्या याबद्दल ट्रक्टर आणि ट्रोली जोडणारा उत्पादन विकसित केला. हा पुरस्कार मला भविष्यात अधिक चांगले काम करण्यासाठी प्रेरणा देईल असे मत त्यांनी मांडले.

या संपूर्ण प्रवासात मॅजिकने उत्पादन विकसित करण्यासाठी मोलाची मदत केली असल्याचे त्यांनी नमूद केले.

सुनील रायथत्ता, रितेश मिश्रा, मिलिंद कंक, प्रसाद कोकीळ, केदार देशपांडे आणि आशिष गर्दे या मॅजिकच्या संचालक आणि यंग इंडिअन्स औरंगाबाद केंद्राच्या असीम अभ्यंकर, स्वप्नील अन्सरवाडकर, योगेश पवार यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. या यशाबद्दल मॅजिक टीमच्या वतीने अक्षय चव्हाण यांचे अभिनंदन करण्यात आले.

# कृषी विभागाच्यावतीने पळाशी येथे सेवा पंधरवडा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पळाशी येथे सोयगाव कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस. जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण सोयगाव तालुक्यात व सोयगाव मधे सेवा पंधरवाडा कार्यक्रम घेण्यात आला. या सेवा पंधरवड्यात कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील नियोजन व रब्बी ज्वारी प्रकल्प बाबत सविस्तर असे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावरती हरभरा बियाणे उपलब्ध होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी या योजनेअंतर्गत अर्ज सेतू सुविधा केंद्रावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावे, असे मार्गदर्शन कृषी सहाय्यक आर. एन. सोळंके यांनी केले. यावेळी या कार्यक्रमास गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रेणुका देवी मंदिरात भाविकांची गर्दी; करावा लागतो असुविधेचा सामना



आधुनिक केसरी न्यूज

**राणीसावरगाव :** गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथे रेणुका देवी हे जागृत देवस्थान असून येथे महाराष्ट्रातून तसेच बाहेर राज्यातून भाविक दर्शनासाठी येत असतात आज नवरात्र महोत्सवाचा पाचवा दिवस असूनसुद्धाभाविका निदर्शनासाठी अफाट गर्दी झालेली दिसून येत आहे. मागील दोन वर्ष लॉक डाऊन मुळे दर्शन न झाल्यामुळे यावर्षी भाविकांनी खुप गर्दी केली आहे . पण मंदीर प्रशासनाकडून भाविकांची हवी तशी व्यवस्था होत नसल्यामुळे त्यांना असुविधेचा सामना करावा लागत आहे. रांगेमध्ये पाणी तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध केलेल्या दिसून येत नाहीत. भक्तीनिवास दोन असून दोन्ही खाजगी शाळांना भाड्याने दिले असल्यामुळें भाविकांना रस्त्यावर तसेच कुठेतरी सावलीचा अधार घेऊन बसावे लागते आहे. पोलीस प्रशासनाकडून लोकाना रांगेत लावणे तसेच कुठेही अनुचित प्रकार घडूनये म्हणून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. एवढे प्रसिद्ध देवस्थान असून भाविकासाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी चर्चा भाविकामधून होत असताना दिसत आहे.

# शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाकडून



युवासेनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. शिंदे गटाच्या प्रवक्त्यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

या कार्यकारिणीत शिंदे गटातील नेत्यांच्या मुलांना संधी देण्यात आल्याचे कार्यकारिणीतील नावांवरून दिसून येत आहे. मंत्री दादा भुसे, अर्जुन खोतकर, आमदार सदा सरवणकर, आमदार प्रकाश सुर्वे यांच्या मुलांना या कार्यकारिणीत संधी देण्यात आली आहे. याबरोबरच युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्यासोबत काम करणाऱ्यांन चेहऱ्यांना शिंदेंच्या युवासेनेच्या कार्यकारिणीमध्ये जबाबदारी देण्यात आली आहे. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर भाजपच्या मदतीने एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले. परंतु, ते एवढ्यावरच थांबले नाहीत तर बंडखोरी केल्यापासून एकनाथ शिंदे यांच्याकडून शिवसेनेला वेगवेगळ्या कारणांनी सतत आव्हान देण्यात येत आहे. एकनाथ शिंदे यांनी आपलीच शिवसेना खरी असल्याचे सांगत बंडखोरीनंतर त्यांच्या गटाची नवी कार्यकारिणी जाहीर केली होती. त्यानंतर आता शिंदे गटाकडून युवासेनेची देखील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे शिंदे गटाकडून उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा धक्का असल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेच्या 55 पैकी 40 आमदार आणि 18 खासदारांपैकी 12 खासदार शिंदे गटाकडे आले आहेत. त्यामुळे खरी शिवसेना आमचीच असल्याचा दावा शिंदे गटाकडून करण्यात येत आहे. निवडणूक आयोग खरी शिवसेना कोणाची हे ठरवणार आहे. परंतु, त्याआधीच शिंदे गटाकडून युवासेनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्यामुळे याचा देखील या निकालावर परिणाम होण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

# अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराजाचे कंबरडेच मोडले

## पावसामुळे पिके कोमात ; तुरीवरही अळीचा प्रादुर्भाव



आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराज्याचे कंबरडेच मोडले असून सततच्या पावसाने खरीपातील पीकांचे अतोनात नुकसान झाले आहे . पावसामुळे पिके कोमात गेली असून कापुस व तुरीवर अळीचा प्रादुर्भाव दिसत आहे. आता तुर व कपाशीवर अळीचा प्रादुर्भाव झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. सोयगाव तालुक्यातील देव्हारी, सावळदबारा, टिटवी, नांदा, घाणेगाव तांडा, डाभा, चारू, पिंपळवाडी या परिसरातील शेतकऱ्यांचे खरीपातील मका व कपाशी हे मुख्य पीक असून या सोबतच आंतरपीक म्हणून मुग, उडीद व तुरीची लागवड केली जाते. परंतु यंदा सुरुवातीपासूनच पावसाचे धुमसान चालु असल्याने पीकांची हवी तशी वाढ झालेली नाही. यास मका अपवाद असली तरी अनेक भागातील शेतात पावसाचे पाणी साचल्याने पिक पिवळी पडली .असून जास्त पाण्यामुळे झाडे सुकून खराब होत आहे. सोमवारी दिवसभर परिसरात पावसाची जोरदार रिपरिप सुरुच होती. दरम्यान, पाण्यामुळे पिक खराब होऊ लागल्याने झाडांना नत्र, स्फुरद व पालाश या घटकांचे योग्य असे अन्न द्रव्य भेटत नसल्याने प्रतिदीन झाडांची रोग प्रतिकारक शक्ती घटू लागली आहे. त्यामुळे कपाशीसह तुरीवर वेगवेगळे किटक व रोग हल्ला चढवीत असल्याने पिकांची वाताहत होत आहे. सततच्या पावसामुळे पिकांवर किटकनाशक औषधांची फवारणी केल्यावर लगेचच त्यावर पाऊस पडत असल्याने त्याचा पिकांना कुठल्याच प्रकारे गुण येत नसल्याने शेतकऱ्यांचा औषधीचा खर्चही वाया जात आहे. औषधी फवारणीसाठी २० लिटर पंपाच्या यंत्राने फवारणी करणारे ५० रुपये टाकी प्रमाणे शेतकऱ्यांकडून पैसे आकारत आहे. दरम्यान, सद्या तुरीवर हिरव्या व पिवळसर अळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाला असून अळ्या शेंडा व पाने कुरतडत आहे. त्यामुळे या संकटांना तोंड देता देता शेतकऱ्यांचे अक्षरशः नाकी नऊ आले असून अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराज्याचे कंबरडेच मोडले आहे.

# विषारी भगर : व्यापाऱ्याला वाचवणारा झारीतील शुक्राचार्य कोण ?

## भेसळ करून सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या व्यापाऱ्याला अन्न व औषधी प्रशासन पाठीशी का घालते ?

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**
**गंगापूर :**
औरंगाबाद जिल्ह्यात भगरीतुन विषबाधा झाल्याचा प्रकार सर्वप्रथम गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरातील सावंगी, शिल्लेगाव, बुट्टेवडगाव, गोपाळवाडी व इतर गावात नवरात्रीच्या पहिल्याच माळेला घडला. त्यामुळे अर्धशतकाच्या पुढे उपवासकरू नागरिकांना दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते त्यात लहान मुलांचाही समावेश होता. त्यापाठोपाठ वैजापूर शहरात चारशे, महालगावला पाच,कन्नड तालुक्यातील बनशेंद्रा, बोलटेक तांडा,जैतापूर, बोलटेक तांडा, नांदगीर वाडी आदी गावातील नागरिकांनाही भगरीच्या पिठातुन विषबाधा झाल्याने त्यांना कन्नड येथील शासकीय व खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी काहींना अत्यावस्थ वाटल्याने औरंगाबादला हालवले होते. मात्र हे भगरीच्या पिठातून विषबाधेचे प्रकरण जिल्ह्यात चालू असताना अन्न, औषधी प्रशासन मात्र सर्वत्र कागदी घोडे नाचवण्यात दंग होते. मात्र सत्य परिस्थिती अशी आहे की जिल्ह्यातील विषबाधेचे प्रमुख केंद्र लासूर स्टेशनच असल्याची कुजबज असून ज्या भगरीच्या पिठातून ही विषबाधा संपूर्ण जिल्ह्यात झाली. ते पीठ लासूर स्टेशन येथूनच जिल्हाभरात एका होलसेल व्यापाऱ्याने किरकोळ दुकानदारांना विकले व त्या पिठाच्या पाकिटावर कुठल्याही प्रकारचा बॅच नंबर, मॅनुफॅक्यूचिरिंग डेट, किंवा बेस्ट बिफॉर डेट असा कुठलाही ट्रेडमार्क नव्हता तरीसुद्धा जिल्हाभरात बिनबोभाट हे पीठ लासूर स्टेशन येथील एका बड्या व्यापाऱ्याने जिल्हाभरात विकले. मात्र अन्न औषध प्रशासन डोळ्याला पट्टी लावून फिरत असून विषबाधा झाल्यानंतरही कागदी घोडे नाचवल्या पलीकडे या विभागाने काहीही केले नाही. उलट नागरिकांच्या जीवाशी खेळल्याप्रकारणी भा.द.वी कलम 328 प्रमाणे या मुख्य व बड्या व्यापाऱ्यावर गुन्हा दाखल होणे गरजेचे असताना या विभागाने जबावदारी झटकावत जिल्हाभरात पोलिसांकरवी निर्दोष असणाऱ्या किरकोळ दुकानदारांवर कलम 273 व 323 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले जे गुन्हे जामीनपत्र आहेत. या प्रकारणात अन्न औषध प्रशासनाने भेसळ केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाहीं मग जिल्ह्यात विषबाधेस कारणीभूत असलेल्या लासूर स्टेशन येथील बडा मासा असणाऱ्या व्यापाऱ्याला वाचवणारा विषारी भगर प्रकरणातील मुख्य व्यपाऱ्याला वाचवणारा झारीतील शुक्राचार्य कोण ? अन्न औषधी प्रशासनाचे अधिकारी कारवाईसाठी कोणाच्या भूमिकेखाली बोटचेपी भूमिका घेतेय की राजकीय दबाव या विभागावर आहे. यामुळे जनता संभ्रमात असून यप्रकरणी पोलिसांनी खोलवर जाऊन चौकशी करावी व दूध का दूध व पाणी का पाणी करून खऱ्या दोषी व्यापाऱ्याला शोधून जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या व्यापाऱ्याला शिक्षा करण्याची मागणी शेतकरी नेते महेश गुजर यांनी केली आहे.




भगरीच्या पिठातून जिल्हाभरात जी विषबाधा झाली आहे त्याचे मुख्य केंद्र लासूर स्टेशन हेच असल्याची चर्चा जिल्ह्यात आहे . कारण विषबाधा झालेल्या जिल्हाभरातील बहुतेक रुग्णांकडून पिठाचा जो नमुना व पाकीट जमा केले ते सिल्वर रंगाचे असून त्यावर फक्त भगर पीठ असा उल्लेख असून याची पॅकिंग लासूरलाच झाल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली असून मागील वर्षी कोरोनोचा लॉकडाऊन असल्याने खरेदी केलेली कित्येक टन भगर लासूर स्टेशन येथील या बड्या व्यापाऱ्याकडे तशीच पडून होती . यावर्षी ती भगर मजुराकरवी चाळून, साफ सफाई करून त्या भगरीचे गिरणीत पीठ केले व त्या पिठात नवीन पीठ भेसळ करून कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता निर्लज्जपणे जिल्ह्यात किरकोळ दुकानदारांना विकली, अशी चर्चा लासूर स्टेशनला नागरिकात आहे . मग अन्न औषधी प्रशासन नेमके काय करते ? त्यांचा अंकुश जिल्ह्यातील व्यापाऱ्यावर अ नाहीं किंवा काही अधिकारी व व्यापारी यांच्यात काही अर्थपूर्ण संबंध आहेत कीं काय किंवा त्यांच्यावर काही राजकीय पुढाऱ्यांचा दबाव आहे की काय ? असेल तर तो राजकीय पुढारी कोण ? असा दबाव नसेल तरे मग अन्न, औषध प्रशासन कारवाई न करता पोलिसांना का बळीचा बकरा करतेय ? औषध प्रशासन या प्रकरणी बोटचेपी भूमिका घेत असून कोणाच्या तरी राजकीय दबावाला किंवा अर्थपूर्ण बाबीला बळी पडत असल्याची चर्चा असून मुख्य व्यापारी मोकाट सोडून चोर सोडून संन्यासाला फाशी देण्याचा प्रकार तर नाहीं ना असाही सूर नागरिकांनातून निघत असून किमान पोलिसांनी तरी या प्रकारणाचा उलगडा करावा व नागरिकांसमोर सत्य उघड करावे असेही नागरिकांतून बोलले जात आहे .

अन्न व औषध प्रशासने सणासुदीच्या काळात ग्रामीण भागात आठवडी बाजार, दुकानात विक्री होणारे खाद्यपदार्थ वस्तू गुणवत्ता वेळोवेळी तपासणी करून नियम न पाळणाऱ्या दुकानदार व्यापारी यांच्या विरोधात अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत कारवाई करायला हवी परंतु जिल्ह्यातील अन्न व औषध विभाग उंटावरून शेळ्या हाकते की काय असा सवाल मा .आ .हर्षवर्धन जाधव यांनी उपस्थित केला .

# धुळेकरांना दहा दिवसाआड पाणीपुरवठा

## किरण जोंधळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे माठ फोड आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरासह जिल्हाभरात ओला दुषळाचे सावट आहे. धुळे शहरातील नकाणे, डेडरगांव, हरणमाळ, अक्कलपाडा मध्यम प्रकल्प, तापी पाणी पुरवठा यात पाण्याचा गेल्या 2 महिन्यांपासून ओव्हरफ्लो सुरु आहे. पांझरा नदी गेल्या जुलै महिन्यांपासून दुथडी भरून वाहत असतांना महानगरपालिकेचे आयुक्त, महापौर, स्थायी समिती सभापती यांच्या बेजबाबदार प्रशासनामुळे नियोजनशुन्य अभावाने धुळेकरांना 10-12 दिवसाआड कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात धुळेकरांच्या घशाला कोरड पडली आहे. धुळेकरांची सध्याची अवस्था धरण उषाशी, कोरड घशाशी अशी झाली असून धुळेकरांच्या समस्या सोडविण्यासाठी ज्या भाजपाला प्रचंड बहुमतांनी मनपाची सत्ता दिली तिथले लोकप्रतिनिधी, नगरसेवक केवळ विकास कामाच्या नावाखाली रस्ते, गटारी यांचे बिले काढण्यात व्यस्त आहेत किरण जोंधळे यांनी केले महानगरपालिकेच्या आयुक्तांनी झोपेचे सोंग घेतले असून प्रशासनावरील वचक संपल्यामुळे महानगरपालिकेत अराजकता माजली आहे. त्याचा परिणाम धुळेकरांना सहन करावा लागत असून अनियमित पाणीपुरवठ्यामुळे धुळेकर पुरते बेजार झाले आहेत. धुळे शहरात तापी योजना व हनुमान टेकडी जलशुध्दीकरण केंद्र येथील पंपींग स्टेशनवरील पंप खराब झाले असून सद्यस्थितीत दोनच पंप कार्यान्वीत असून अनेक भागात गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. शहरातील नगावबारी, रामनगर, मायक्रोव्हेव, मधुबापू माळी, अशोक नगर, मोहाडी, मनमाड जीन, चक्करबर्डी, चितोड रोड येथील जलकुंभ पुरेशा प्रमाणात भरलेच जात नसून 10-12 दिवसाआड येणारे पाणी तेही कमी प्रमाणात त्यामुळे नागरिक वैतागले आहेत. 136 कोटींची पाणी पुरवठा योजना मनपाच्या भाजपा सत्ताधाऱ्यांनी बासनात गुंडाळली आहे. या पाणीपुरवठा योजनाच्या माध्यमातून शहरात अनेक ठिकाण नव्याने जलकुंभाची निर्मिती करण्यात आली. पण या जलकुंभात पाण्याचा एकही थेंब गेल्या अनेक वर्षांपासून पडलेला नाही. परिणामी मनमाड जीन येथील नवीन जलकुंभाच्या मध्यभागातील स्लॅब कोसळला आहे. त्यामुळे शासनाच्या कोट्यावधी रुपयांचा चुराडा झाला आहे असे आरोप करण्यात आले. एकीकडे दररोज पाणीपुरवठा करू या घोषणा करणारे महाभाग 10-12 दिवसाआड येणाऱ्या पाण्याच्या प्रश्नावर मुग गिळून बसले आहेत. केवळ अकार्यक्षम नियोजनामुळे धुळेकर बेहाल आहेत. एकंदरीतच महापालिका सत्ताधाऱ्यांना धुळेकरांचे प्रश्न सोडविणाऱ्यावर अपयश आलेले आहे. धुळेकरांना दररोज नकोच पण पाच दिवसाआड तरी नियमित पाणीपुरवठा करा अशी आर्त हाक सत्ताधाऱ्यांकडे करावी लागत आहे. या सर्व प्रकारात महानगरपालिकेने निर्लज्जपणाचा कळस घातला असून शिवसेनेने मनपा प्रशासन व सत्ताधारी भाजपाचा निषेध करीत आज मनपात रिकामे माठ फोडो आंदोलन करून येत्या 5 दिवसांत सर्व भागातील पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या वेळी सहसंपर्क प्रमुख महेश मिस्तरी, शिवसेना जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हा प्रमुख किरण जोंधळे, जिल्हा संघटक भगवान करनकाळ, मा.आ.प्रा. शरद पाटील, महानगरप्रमुख धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन, शहर संघटक राजेश पटवारी, देविदास लोणारी, विधानसभा संघटक ललित माळी, शहर समन्वयक नितीन शिरसाठ, गुलाब माळी, भरत मोरे, चंद्रकांत गुरव, हेमा हेमाडे, डॉ. जयश्री वानखेडे आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# लासूरला चोरट्यांनी किराणा दुकान फोडले

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथील अशोक कॉलोनी गेट समोरील रमेश कोठारी यांच्या मालकीचे परेश किराणा स्टोयरचा पत्रा गुरुवारी 29 तारखेला मध्यरात्रींनंतर उचकाटून विविध पाचशे सिगारेटचे पाकीट व आठ ते दहा हजार रुपये रोख रक्कम चोरट्याने लांबवली असल्याची माहिती दुकानदार रमेश कोठारी यानी दिली असून घटनास्थळी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस भिसे हे दाखल झाले होते दरम्यान चोरटा सिसिटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून ही दुकान तीन मजली असून तिसऱ्या मजल्यावरील पत्रा दोन ठिकाणी कापून चोरट्यानी दुकानात प्रवेश केला व सिगारेटचे पाकीट व रोख रक्कम लांबवली असून अधिक तपास शिल्लेगाव पोलीस करत आहे.

# महावितरणच्या खांबाला वेलीचा फास; कर्मचारी वसुलीत दंग

## वर्दळीच्या ठिकाणी असणाऱ्या अनेक ट्रांसफार्मरलाही वेलीने गुरफटले, महावितरणने स्वच्छता मोहीम राबविण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**
**उस्मानाबाद :** संपूर्ण जिल्ह्यातील अनेक मानवी वस्तीत व वरदळीच्या ठिकाणी असणाऱ्या महावितरणच्या ट्रान्सफॉर्मर ला तसेच मुख्य रस्त्यावरील खांबांना वेलींनी विळखा घातल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर ला झाडाझुडपांनी व्यापले आहे. तर महावितरणच्या विजवाहक ताराही वेशीवर बांधलेला तोरणाप्रमाणे गावागावात लोंबकळत आहेत. वीज वाहक खांबाच्या अर्थिंग दाराचा आधार घेत या वेलींनी अर्थिंग च्या तारा पासून ते खंबापर्यंत आणि खांबापासून ते ट्रांसफार्मर पर्यंत एक प्रकारचा मांडव तयार केला आहे. त्यामुळे शेळी मेंढी गाय व इतर पशु हिरव्या चारा खाण्याच्या नादात ट्रांसफार्मर जवळ तसेच अर्थिंग च्या तारा जवळ येतात. यामुळेही अनुचित जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अनुचित प्रकार घडत आहेत. तर ठीक ठिकाणी लोंबकाळणाऱ्या व अतिशय जिर्ण झालेल्या विद्युत वाहक तारांचे शॉर्ट सर्किट होऊन शेतमालाला लागणाऱ्या आगीच्या घटनाही दरवर्षी घडतात. या महावितरणच्या अंदाधुंदी कारभाराला कधी चाप बसेल का फक्त सक्तीची वीज बिल वसूल करणे हेच महावितरणचे धोरण आहे का? मात्र महावितरणचे कर्मचारी याकडे काना डोळा करत वीज बिल वसुलीतच दंग असल्याचे दिसत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देण्याची मागणी जनतेमधून होत आहे.





मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977




# छंद नंदादीपासारखा प्रकाश देतील : सुधीर कोर्टीकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** खडकेश्वर परिसरातील किड्स झी फ्री स्कूलमध्ये नवरात्रीच्या उत्सवाचे औचित्य साधून महिलांसाठी मुलां मुलींसाठी अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. पुजेचे ताट सजविणे, गरबा नृत्य, संगीत खुर्ची, चमचा लिंबू , धावण्याची शर्यत, फुलांच्या नी भाज्यांची रांगोळी स्पर्धा. सर्वच स्पर्धांना महिला, मुलामुलींनी उदंड प्रतिसाद दिला होता. संपूर्ण स्पर्धांचे परीक्षक व मुख्य अतिथी म्हणून प्रसिद्ध कलावंत सुधीर कोर्टीकर यांना निमंत्रित केले होते. प्रमुख अतिथींचे स्वागत सिद्दिकीसरांनी शाल श्रीफल व पुष्पगुच्छ देवून केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश धुंदेसरांनी केले. सूत्रसंचालन रजनी नागवंशी यांनी केले. प्रमुख अतिथी सुधीर कोर्टीकर यांनी आपल्या मार्गादर्शपर भाषणात सांगितले की, बालपणापासून कला गुण छंद जोपासयाला हवेत. पुढे हेच छंद एखाद्या नंदादीपा सारखें तुम्हाला जीवनभर प्रकाश देणार आहेत हेच खरं. कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. किड्स झी फ्री स्कूलच्या या छोटेखानी कार्यक्रमाला शिक्षक, पालक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डिघोळ देवीचा शारदीय नवरात्र उत्सव सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** तालुक्यातील डिघोळ येथील रेणुका माता देवीच्या शारदीय नवरात्री उत्सवास सोमवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी घटस्थापनेपासून प्रारंभ झाला असून हा नवरात्र उत्सव पुढे बुधवार दिनांक ५ ऑक्टोंबर दसरा या दिवसापर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी या उत्सवामध्ये देवींच्या गाण्यांचे कार्यक्रम व दररोज महाप्रसादासह ईतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रती वर्षा प्रमाणे याही वर्षी सोनपेठ तालुक्यातील डिघोळ येथील रेणुका माता मंदिरातील शारदीय नवरात्र उत्सवास नुकताच प्रारंभ झाला असून यावेळी या उत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. डिघोळ येथील रेणुका मातेचे मंदीर सोनपेठ पासून परळी कडे जाणाऱ्या रस्त्यावर १० किमी अंतरावर तर सोनपेठ-परळी या मुख्य रस्त्यापासून तीन किलोमीटर पुढे पश्चिम दिशेला गेल्यास रेणुकादेवीचे मंदिर उंच डोंगरावर विराजमान आहे. या मंदिराच्या गाभाऱ्यात माहूरची रेणुका माता व



राणीसावरगाव ची रानुबाई या देवीचे मुर्तीमंत मुखवटे स्थानापन्न असून मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर डाव्या बाजूल तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेची मूर्ती आहे. या मंदिराचा मुख्य सभामंडप हेमाडपंती पद्धतीने पूर्वीच्या काळी दगडापासून उभारलेला असून मंदिराचा शिखराचा घुमट जुन्या कलेचा उत्तम नमूना असल्याने भाविकांना आकर्षित करून घेतो. या मंदिराच्या परिसरात नव्याने वेगवेगळ्या प्रकारे सुधारणा करण्यात आल्या असून मंदिराच्या आतील व बाहेरील प्रांगणात गट्टू फर्शी बसविण्यात आली आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूस असलेल्या दगडी लादण्या व मंदिरासमोरील डिकमाळी या अत्यंत दुर्मिळ असून त्यांचे जतन करण्यासाठी याची आता सिमेंट वाळू पासून डागडुजी करण्यात आलेली आहे. तसेच मंदिराच्या परिसरामध्ये वेगवेगळ्या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले असून मंदिराच्या सुशोभीकरणासाठी कमिटीतर्फे सदैव प्रयत्न करण्यात येत आहेत.मंदीरावर विद्यूत रोषणाई सर्वत्र झगमगतांना दिसत असून भावीकांनी दर्शनासाठी रिघ लावली आहे. सोनपेठ तालुक्यासह जिल्हाभरातून व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक भाविक या देवीच्या दर्शनासाठी येतात. मागील काही वर्षापासून नवरात्रोत्सवामध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तासाठी अन्नछत्र सुरू आहे. दररोज वेगवेगळ्या अन्नदात्यां कडून अन्नदानाची दहा दिवस अखंड सेवा सुरू राहते. देवीच्या समोर दोन कल्लोळ असून पूर्वीच्या काळी देवीच्या मंदिरासमोर पाण्याची सुविधा नसल्याने अनेक भाविक दर्शनासाठी येथे येताना भाजी भाकरी घेऊन येत व दर्शनानंतर देवीच्या समोर बसून जेवण केल्यानंतर या कल्लोळातील पाणी पिऊन तृप्त होत असत. परंतु सध्या देवीच्या समोर पाण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे आता या कल्लोळातील पाणी पिण्याचे प्रमाण कमी झाले आहे.या देवी मंदिराची स्थापना इसवी सन १६०० मध्ये समर्थ रामदास स्वामी यांनी केली असल्याचे सांगितले जाते.निजाम कालखंडापासून देवि मंदीराची देखभाल डिघोळ येथील देशमुख घराने करत असुन आजही विजयकुमार देशमुख, रमाकांत देशमुख,रंजित देशमुख व अन्नासाहेब देशमुख यांना आरती,पुजा व सिमोल्लंघनाचा मान कायम आहे.

# कृषीमंत्री सत्तारांचा उद्धव ठाकरेंना टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** औरंगाबादेतील शिंदे गटाच्या मेळाव्यात शिवसेनेचे बंडखोर नेते आणि राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. एक मुख्यमंत्री पडद्याआड राहायचे, तर एक जनतेत राहतात असा खोचक टोला सत्तार यांनी ठाकरेंना लगावला आहे. शिंदे गटात आणखी चार ते सहा आमदार आणि दोन खासदार येणार असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी यावेळी केला. "मला कुत्रा निशाणी दिली तरी मी निवडून येईल", असा आत्मविश्वास सत्तार यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्याला कधीच कोणाची भीती नसते. कार्यकर्तापद कधीही कोणीही हिसकावू शकत नाही, असे सत्तार या मेळाव्यात म्हणाले आहेत. गुरुवारी पत्रकारांशी बोलताना उद्धव ठाकरेंना एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व मान्य करून जुळवून घेण्याचा सल्ला त्यांनी दिला होता. या सल्लानंतर सत्तार यांनी पुन्हा ठाकरेंवर शाब्दिक हल्ला चढवला आहे. खरी शिवसेना कोणाची हे दसरा मेळाव्यात कळेल, असेही सत्तार शिंदे गटाच्या मेळाव्यात म्हणाले आहेत. परभणी दौऱ्यावर असताना जाहीर सभेत बोलताना सत्तार यांनी शिंदे गटात पाच आमदार आणि दोन ते तीन खासदार येणार असल्याचा दावा केला होता. याच दाव्याचा आज औरंगाबादेत त्यांनी पुनरुच्चार केला आहे. या आमदार आणि खासदारांच्या नावांबाबत अद्याप अस्पष्टता आहे. शिंदे गटात आणखी कोणत्या मतदारसंघातील आमदार, खासदार प्रवेश करणार याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.



# साई सेवाच्या दसरा महोत्सवाची जय्यत तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगाखेड :** येथील श्री साईसेवा प्रतिष्ठानच्या दसरा महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. आतीषबाजीसह दहन करण्यासाठीच्या अपप्रवृत्तींच्या ५१ फुटी पुतळ्याच्या निर्माण कामाचा प्रारंभ आज करण्यात आला. तीन वर्षांच्या अवकाशानंतर गंगाखेडच्या गोदातटावर हा सोहळा रंगणार असून यामुळेच विशेष ऊत्साहात हा सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती संयोजक तथा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष गोविंद यादव यांनी दिली आहे.

गंगाखेडचा दसरा सर्वदूर प्रसिद्ध आहे. श्री बालाजींच्या रथ यात्रेस भाविकांची मोठ्या संख्येने ऊपस्थिती असते. या रथ परिक्रमेनंतर श्री साई सेवा प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात येणारे पुतळा ( रावण) दहन आणि नेत्रदिपक आतिषबाजी हा अबालवृद्ध, भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो. या सोहळ्यास पंचक्रोशीतील हजारो भाविकांची ऊपस्थिती असते. यावर्षी दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता हा सोहळा संपन्न होणार आहे. आज गंगाखेडच्या स्मशानभूमीत पुतळा बनवण्याच्या कार्याचा आरंभ प्रतिष्ठाणचे सचिव, अभियंता नागेश पैठणकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या प्रसंगी संयोजक - अध्यक्ष गोविंद यादव, रमेश औसेकर, मनोज नाव्हेकर, जगदिश देशमाने, मुर्तीकार विठ्ठल भुसांडे, गजानन जोशी, मारोती गोरे, सुहास देशमाने, भारत गोरे, गंगाराममामा शंकुवाड, व्यंकट यादव, महेश परडे आदिंची ऊपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in